गुरुवार, २ डिसेंबर २०२१

# राम प्रहर


◆ वर्ष १४ ◆ अंक १३५
www.ramprahar.com

◆ पाने ६ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

अंतरंग

'त्या' बैठकीमागे कटकारस्थान -आशिष शेलार/२
शिक्षकाकडून अल्पवयीन विद्यार्थिनीचा विनयभंग/५
राष्ट्रीय खो-खो स्पर्धेत महाराष्ट्राला दुहेरी मुकूट/६

## आंतरराष्ट्रीय विमानसेवा सुरू करण्याचा निर्णय लांबणीवर



**नवी दिल्ली :** नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने १५ डिसेंबरपासून सुरू होणारी नियमित आंतरराष्ट्रीय विमानसेवा सुरू करण्याचा निर्णय लांबणीवर टाकला आहे. कोरोनाचा नवा विषाणू ओमायक्रॉनचा धोका लक्षात घेता हा निर्णय काही काळासाठी पुढे ढकलण्यात आला आहे. नवीन तारखेची घोषणा पुढील परिस्थितीचा आढावा घेऊन केली जाईल, असे सांगण्यात आले आहे. नवा विषाणू अधिक घातक असून तो वेगाने पसरत असल्याचे म्हणत जागतिक आरोग्य संघटनेने सर्व देशांना सतर्क केले आहे. त्यामुळे बहुतांश देशांनी आंतरराष्ट्रीय विमानसेवेवर निर्बंध आणले आहेत. खबरदारी म्हणून मोदी सरकारनेही येत्या १५ डिसेंबरपासून सुरू होणाऱ्या आंतरराष्ट्रीय उड्डाण सेवेचा निर्णय तूर्त स्थगित केला आहे.

# कोकणासह राज्यात संततधार

## अवकाळी पावसामुळे जनजीवन विस्कळीत

**मुंबई : प्रतिनिधी**

**कोकणासह राज्यातील अनेक भागांमध्ये बुधवारी (दि. १) अवकाळी पावसाने हजेरी लावली. त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले. सततच्या अवकाळी पावसामुळे बळीराजा तर हतबल झाल्याचे चित्र आहे.**



हवामान खात्याच्या वर्तविलेल्या अंदाजानुसार बुधवारी अवकाळी पाऊस पडला. काही ठिकाणी पावसाने मंगळवारीच हजेरी लावली होती, तर काही भागांत हवामान ढगाळ होते. या पावसाची रिपरिप बुधवारी सायंकाळपर्यंत सुरूच होती. त्यामुळे कामावर जाणारे लोक आणि पहिल्याच दिवशी शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे हाल झाले. या वेळी अनेकांनी आपल्या छत्र्या, रेनकोट बाहेर काढल्याचे दिसून आले. या अवकाळी पावसाचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना बसला आहे.

**लग्नसोहळ्यांवर 'पाणी'**

तुळशीच्या विवाहानंतर सर्वत्र लग्नांची धूम सुरू झाली आहे, मात्र अवकाळी पावसाने साऱ्या आनंदावर पाणी टाकले आहे. दरम्यान, राज्यात ३ डिसेंबरपर्यंत पावसाची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे.

## रब्बी पिकांना फटका; बळीराजा चिंतातूर

**अलिबाग :** अरबी समुद्रात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्यामुळे रायगड जिल्ह्यात बुधवारी (दि. १) जलधारा बरसल्या. या अवकाळी पावसाचा गरव्या जातीचा भात, रब्बी हंगामातील कडधान्य, भाजीपाला, पांढरा कांदा, तसेच आंबा पिकाला फटका बसण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकरी चिंतातूर आहे.

जिल्ह्याच्या काही भागांत गरव्या जातीच्या भाताची लागवड केली जाते. हा भात उशिरा पिकतो. त्यामुळे त्याची कापणीदेखील उशिराने केली जाते. कापणी न केलेल्या गरव्या जातीच्या भातपिकाचे या अवकाळी पावसामुळे नुकसान होणार आहे.

रायगड जिल्ह्यात रब्बी हंगामामध्ये चार हजार ५०० हेक्टर क्षेत्रावर कडधान्य व भाजीपाला लागवड केली जाते. अलिबाग तालुक्यात भात कापणीनंतर पांढऱ्या कांद्याची लागवड केली जाते, मात्र या पावसामुळे शेतात पाणी साचून नुकतीच रूजलेली कडधान्य व भाजीपाल्याची रोपे कुजण्याची भीती आहे. पांढऱ्या कांद्याच्या पिकाचेदेखील नुकसान होणार आहे.

आंब्याचा मोहोर अवकाळी पावसामुळे गळून पडण्याची, तसेच रोगांचा प्रादूर्भाव होण्याचीही भीती आहे.

## आता यूपीए राहिलेली नाही! -ममता बॅनर्जी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



भाजपप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीला (एनडीए) पर्याय म्हणून संयुक्त पुरोगामी आघाडी अर्थात यूपीएचा जन्म झाला होता. काँग्रेस अध्यक्ष सोनिया गांधी यांनी यूपीएचे नेतृत्व करताना आघाडीला देशात दोन वेळेस सत्ता मिळवून दिली, पण सध्या पुन्हा एनडीएचे सरकार सत्तेत असताना यूपीए मात्र निष्प्रभ झाली आहे. या पार्श्वभूमीवर आता यूपीए राहिलेली नाही. याबाबत फक्त घोषणा करणेच बाकी आहे, असे पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री आणि तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा ममता बॅनर्जी यांनी म्हटले आहे.

तीन दिवसीय मुंबई दौऱ्यादरम्यान ममता बॅनर्जी यांनी बुधवारी (दि. १) राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांची भेट घेतली. यानंतर संयुक्तरीत्या पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी यूपीएच्या पुन्हा एकदा शक्यतेला सुरूंग लावला.

बॅनर्जी माध्यमांशी बोलत असताना पत्रकारांनी त्यांना प्रश्न विचारला की, शरद पवार यूपीएमधील सर्वांत वरिष्ठ नेते आहेत. त्यामुळे तुम्हाला असे वाटते का की शरद पवारांनी यूपीएचे नेतृत्व करायला हवे? पत्रकारांच्या या प्रश्नावर काहीशा संतापलेल्या स्वरात ममता म्हणाल्या, अरे तुम्ही यूपीएची काय भाषा करता, आता यूपीए राहिलेली नाही. फक्त हे जाहीर करायचे बाकी राहिले आहे.

भाजपविरोधात कोणी लढायला तयार नाही. त्याला आम्ही काय करणार, अशा शब्दांत बॅनर्जी यांनी या वेळी काँग्रेसवर टीकास्त्र सोडले.

दरम्यान, बॅनर्जी यांनी पुन्हा यूपीएची शक्यता फेटाळत लावत काँग्रेस, राष्ट्रवादीसह समविचारी पक्षांसोबत भाजपविरोधात एकत्र येण्याला नकार दिल्याचे म्हटले जातेय.

> **यूपीए संपली म्हणजे ममता बॅनर्जी यांनी काय काँग्रेस विसर्जित केली आहे का? काँग्रेसला हे मान्य आहे का? आणि काँग्रेसविरोधात अशी घेतलेली भूमिका ही शिवसेनेच्या समर्थनावर घेतली आहे का? या सगळ्या गोष्टींचा उलगडा त्यांना करावा लागणार आहे.**
>
> **-आमदार आशिष शेलार, भाजप नेते**

### ...तर ते फक्त दिवास्वप्न -काँग्रेस

**नवी दिल्ली, मुंबई :** पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री आणि तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्ष ममता बॅनर्जी यांनी संयुक्त पुरोगामी आघाडी (यूपीए) आता राहिलेली नाही, असे मुंबईत पत्रकारांशी बोलताना म्हटले. यावर काँग्रेसने उत्तर दिले आहे. सगळ्यांना भारतीय राजकारणाचे वास्तव चांगलेच माहितंय. जर कुणी काँग्रेसला वगळून स्वप्ने पाहत असेल, तर ते फक्त एक दिवास्वप्नच असेल, अशी प्रतिक्रिया काँग्रेसचे जनरल सेक्रेटरी केसी वेणुगोपाल यांनी दिली.

काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी ममता बॅनर्जी यांच्यावर टीका केली आहे. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन व्यक्तिगत महत्त्वाकांक्षेला बाजूला ठेवून राष्ट्रहितासाठी, लोकशाही व संविधान वाचविण्यासाठी सर्व समविचारी राजकीय पक्षांनी एकत्रित येऊन लढा देण्याची वेळ आली आहे. एका राज्यापुरता मर्यादित राजकीय पक्ष भाजपला पर्याय ठरू शकत नाही. काँग्रेस हाच भाजपला सक्षम राजकीय पर्याय आहे, असे म्हणत पटोलेंनी बॅनर्जींवर शरसंधान साधले.

## रायगड किल्ला पर्यटकांसाठी पाच दिवस बंद

**अलिबाग : प्रतिनिधी**

राष्ट्रपती रामनाथ कोविंद येत्या ६ डिसेंबरला किल्ले रायगडाला भेट देणार आहेत. त्यांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर सुरक्षेच्या कारणास्तव रायगड किल्ला, तसेच किल्ल्याकडे जाणारे सर्व मार्ग पाच दिवस सर्वसामान्य पर्यटकांसाठी बंद ठेवण्यात येणार आहेत. रायगड पोलिसांनी याबाबतचे प्रसिद्धीपत्रक जारी केले आहे.

राष्ट्रपती रामनाथ कोविंद पहिल्यांदाच किल्ले रायगडावर येत आहेत. ही बाब लक्षात घेऊन या परिसरातील सुरक्षाव्यवस्थेत वाढ करण्यात आली आहे. राष्ट्रपतींच्या सुरक्षेच्या दृष्टीने महाडकडून नाते खिंडमार्गे पाचाडकडे जाणारा मार्ग आणि माणगाववरून निजामपूरकडून रायगड किल्ल्याकडे जाणारे मार्ग पर्यटकांसाठी बंद असणार आहे. त्याचबरोबर रायगड किल्ला, किल्ल्याजवळचा परिसर आणि रोप वे पर्यटकांसाठी ३ ते ७ डिसेंबर या कालावधीसाठी बंद ठेवण्यात येणार आहे. राष्ट्रपतींच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने जोरदार तयारी सुरू केली आहे.

## विवेक पाटलांच्या जामीन अर्जावर आज पुन्हा सुनावणी



**पनवेल : प्रतिनिधी**

कोट्यवधी रुपयांच्या कर्नाळा बँक घोटाळाप्रकरणी जेलमध्ये असलेले बँकेचे चेअरमन आणि शेकापचे माजी आमदार विवेक पाटील यांच्या जामीन अर्जावर गुरुवारी (दि. २) पुन्हा सुनावणी होणार आहे.

याआधी विवेक पाटील यांच्या जामीन अर्जावर न्यायालय २५ नोव्हेंबर रोजी निर्णय देणार होते, पण यावर सरकारी वकिलांना त्यांचे म्हणणे मांडता यावे यासाठी पाटील यांच्या कोठडीत पाच दिवसांची वाढ करण्यात आली. त्यानंतर ३० नोव्हेंबर व १ डिसेंबर रोजीही निर्णय झाला नाही. विवेक पाटील आज सुनावणीस उपस्थित नव्हते, मात्र त्यांच्या वकिलांनी केलेल्या विनंतीनुसार आता ही सुनावणी २ डिसेंबर रोजी होणार आहे.

## निवडक

### कृषी कायदे रद्द करण्याच्या विधेयकावर राष्ट्रपतींची स्वाक्षरी

**नवी दिल्ली :** राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी बुधवारी (दि. १) तीन कृषी कायदे रद्द करण्याच्या विधेयकावर सही केली. हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी कृषी कायदे रद्द करणारे विधेयक दोन्ही सभागृहांमध्ये पारित करण्यात आले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी १९ नोव्हेंबर रोजी कृषी कायदे रद्द केल्याची घोषणा केली होती. यासंबंधीचे फायदे शेतकऱ्यांना समजून सांगण्यात माझी तपस्या कमी पडल्याचे त्यांनी म्हटले होते.

### राज्यात मतदार नोंदणीसाठी ५ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ

**मुंबई :** केंद्रीय निवडणूक आयोगातर्फे राबविण्यात येत असलेल्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमाचा कालावधी वाढविण्यात आला आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांच्या दृष्टीने आता पुन्हा ५ डिसेंबरपर्यंत पात्र नागरिकांना मतदार यादीत नाव नोंदविण्याची संधी प्राप्त झाली आहे, अशी माहिती राज्य निवडणूक आयुक्त यू. पी. एस. मदान यांनी बुधवारी (दि. १) येथे दिली.

## माथेरानच्या भाजप नगरसेवकांना उच्च न्यायालयाकडून दिलासा

### अपात्रतेच्या निर्णयाला तात्पुरती स्थगिती

**कर्जत : बातमीदार**

माथेरान गिरीस्थान नगर परिषदेतील शिवसेनेतून भाजपमध्ये प्रवेश केलेल्या १० नगरसेवकांना मुंबई उच्च न्यायालयाने तात्पुरता दिलासा दिला आहे. या नगरसेवकांचे म्हणणे हायकोर्टाने ग्राह्य मानून त्यांना अपात्र ठरविण्याच्या रायगड जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्णयाला स्थगिती दिली आहे. याबाबत आता नगरविकासमंत्र्यांकडे सुनावणी होईल.


माथेरान पालिकेतील भाजपमध्ये गेलेल्या १० नगरसेवकांना रायगडच्या जिल्हाधिकाऱ्यांनी २८ ऑक्टोबर रोजी पक्षांतर बंदी कायद्याखाली अपात्र ठरवले होते. जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्णयावर दाद करण्यासाठी २१ दिवसांची मुदत होती, मात्र या नगरसेवकांना जिल्हाधिकारी कार्यालयाची सर्टिफाईड कॉपी ९ नोव्हेंबर रोजी मिळाली. त्यानंतर १८ नोव्हेंबरपूर्वी न्यायालयात अपील करणे शक्य नव्हते. त्यामुळे या सर्वांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्णयाविरुद्ध राज्याचा नगरविकास विभाग आणि उच्च न्यायालयात २३ नोव्हेंबर रोजी अपील केले.



दरम्यान, भाजपमध्ये प्रवेश केलेल्या नगरसेवकांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सर्टिफाईड कॉपीअभावी नगरविकास विभाग किंवा उच्च न्यायालयात १८ नोव्हेंबरपर्यंत अपील केले नसल्याने माथेरान नगर परिषद प्रशासनाने जिल्हाधिकारी कार्यालयाला त्याबाबत अवगत करून पालिका कार्यालयातून या १० नगरसेवकांची नावे काढून टाकली, तसेच या सर्व नगरसेवकांच्या अनुपस्थितीत माथेरान पालिकेची सर्वसाधारण सभाही झाली.

माथेरान पालिकेच्या अपात्र नगरसेवकांबाबत ३० नोव्हेंबर रोजी उच्च न्यायालयात सुनावणी झाली. त्यात न्यायालयाने सर्टिफाईड कॉपी मिळण्यासाठी झालेल्या विलंबामुळे निर्धारित २१ दिवसांच्या कालावधीची बाब बाजूला ठेवत नगरसेवकांना आपले म्हणणे मांडण्याची संधी दिली आणि रायगड जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्णयाला तात्पुरती स्थगिती दिली आहे, तर राज्याच्या नगरविकास विभागाकडे दाखल केलेल्या अपिलावर १० डिसेंबर रोजी सुनावणी होणार आहे. ही बाब १० नगरसेवकांच्या वकिलांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली. त्यानंतर न्यायालयाने नगरविकासमंत्र्यांच्या अखत्यारित होणारी सुनावणी होईपर्यंत अपात्रतेच्या निर्णयाला स्थगिती कायम असेल, तसेच नगरविकासमंत्र्यांनी या १० नगरसेवकांविरोधात निर्णय दिल्यास त्यांना वरच्या न्यायालयात अपील करण्यासाठी १० डिसेंबरनंतरचे १५ दिवस या १० नगरसेवकांच्या सदस्यत्व अपात्रता निर्णयाला स्थगिती असणार आहे.





पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
गुरुवार, दि. २ डिसेंबर २०२१ रोजी होणारे

कोरोना प्रतिबंधक लसीकरण

(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड

सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. जुने ग्रामीण रुग्णालय, कोळीवाडा-उरण नाका, पनवेल
- ३. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल
- ४. यूपीएचसी-४, गुरुद्वारासमोर, कळंबोली
- ५. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ६. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे

*सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर (यूपीएचसी) परदेशी जाणाऱ्या नागरिकांसाठी दुसरा डोस उपलब्ध असेल.*

- ७. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल, सेक्टर २
- ८. आरोग्य उपकेंद्र मनुस्मृती रोटरी क्लब, सेक्टर ३०, ओवे गाव, खारघर
- ९. ज्ञानसाधना केंद्र, सेक्टर ६, कामोठे
- १०. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग अ‍ॅण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
- ११. टाटा अ‍ॅडव्हान्स सेंटर, खारघर
- १२. आरोग्य उपकेंद्र १, रोटरी कम्युनिटी सेंटर, सेंट जॉर्ज चर्चजवळ, नवीन पनवेल
- १३. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे-मुंबई हायवे)
- १४. डॉ. आंबेडकर भवन, पनवेल
- १५ न्यू इंग्लिश स्कूल, कळंबोली
- १६. सेंट्रल रेल्वे, पनवेल

कोवॅक्सिन

सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- २. पनवेल जिमखाना, ५२ बंगला, पनवेल
- ३. नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र ५, खारघर.

पनवेल ग्रामीण लसीकरण

- सिद्धी करवले, रा.जि.प. शाळा
- धानसर रा.जि.प. शाळा
- बेलपाडा मंदिर
- पेठ, रा.जि.प. शाळा
- ओवे, रा.जि.प. शाळा
- पाले खुर्द पाटीलवाडी, रा.जि.प. शाळा
- तोंडरे, खालचा पाडा, रा.जि.प. शाळा
- घोट रा.जि.प. शाळा (म्हात्रे पाडा/गोंधळी पाडा/मढवी पाडा/वाघ्राची वाडी
- ढोंगऱ्याचा पाडा, रा.जि.प. शाळा
- कामोठे, रा.जि.प. शाळा


## सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते खारघरमध्ये ई-टॉयलेटचे उद्घाटन

### मैदानाची पाहणी करून घेतला आढावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**





सिडकोकडून हस्तांतरित झालेली उद्याने, मैदानांचे पनवेल महापालिकेच्या माध्यमातून सुशोभीकरण करून नागरिकांना विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. या अंतर्गत खारघर सेक्टर ६ मधील खेळाच्या मैदानाची सभागृह नेते परेश ठाकूर यांनी लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांसह बुधवारी (दि. १) पाहणी केली आणि विविध खेळांसाठी मैदान उभारण्यासंदर्भात आढावा घेतला. या वेळी महापालिकेमार्फत बसवण्यात आलेल्या ई-टॉयलेटचे उद्घाटन करण्यात झाले.

पनवेल महापालिका क्षेत्रातील खारघर सेक्टर ६ वॉर्ड क्रमांक ५ मधील खेळाच्या मैदानात महापालिकेमार्फत ई-टॉयलेट बसवण्यात आले आहे. त्याचे सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते बुधवारी उद्घाटन करण्यात आले. या वेळी त्यांनी अधिकारी आणि लोकप्रतिनिधींसह या मैदानाची पाहणी करून येथील नागरिकांसोबतही चर्चा केली. यादरम्यान नागरिकांनी खेळाच्या मैदानात व्हॉलिबॉल व बास्केटबॉल कोर्ट, सायकल व रनिंगसाठी ट्रॅक, तसेच मैदानालगत असलेले वागोबा मंदिर परिसर सुशोभीकरण करण्यासंदर्भातील मागणी केली असता, सभागृह नेते परेश ठाकूर या संदर्भात आढावा घेऊन उपाययोजना करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना केल्या.

या वेळी स्थायी समिती सभापती संतोष शेट्टी, नगरसेवक हरेश केणी, शत्रुघ्न काकडे, रामजी बेरा, नगरसेविका हर्षदा उपाध्याय, भाजप खारघर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, वासुदेव पाटील, अमर उपाध्याय यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

# ‘त्या’ बैठकीमागे कटकारस्थान -शेलार

## ममतादिदींच्या महाराष्ट्र दौऱ्यावरून ठाकरे सरकारवर टीका

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र दौऱ्यावर असणाऱ्या पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी आणि महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांच्या वतीने त्यांची भेट घेणारे मंत्री आदित्य ठाकरे यांच्यात झालेल्या बैठकीची अधिकृत माहिती महाराष्ट्र शासनाने जाहीर करावी. हे एक कटकारस्थान असून इथले उद्योग पश्चिम बंगालमध्ये घेऊन जाण्यास सत्ताधारी शिवसेना मदत तर करीत नाही ना? असा सवाल भाजप नेते आमदार ॲड. आशिष शेलार यांनी बुधवारी (दि. १) येथे केला.

ममता बॅनर्जी यांचे मुंबईत आगमन झाल्यानंतर महाराष्ट्राचे पर्यावरणमंत्री आदित्य ठाकरे यांनी भेट घेतली. या भेटीबाबत आमदार शेलार यांनी माध्यम प्रतिनिधींशी बोलताना या भेटीबाबत काही गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत.

शेलार म्हणाले की, ममतादिदी यांचे महाराष्ट्रात सरकारी पक्षांनी स्वागत केले ते प्रथेप्रमाणे अपेक्षितच आहे, पण त्यानंतर मंत्री आदित्य ठाकरे यांनी घेतलेली भेट व त्यांची झालेली बैठक कशासाठी होती? महाराष्ट्रात कोणीही आले की आमचा कौटुंबिक स्नेह असल्याचे सांगून या भेटी घेतल्या जातात. तुमचा कौटुंबिक स्नेह असेलही. आम्हाला त्याबद्दल काय करायचे आहे, पण महाराष्ट्राचा त्याच्याशी काय सबंध? बांगलादेशीयांना संरक्षण देणाऱ्या ममतादिदी यांच्याशी कुठले आले कौटुंबिक संबध? असा सवालही त्यांनी केला.

ममतादिदी महाराष्ट्रातील उद्योगांना आपल्या राज्यात यायचे आमंत्रण देण्यासाठी आल्या आहेत. देशभर सर्वत्र उद्योगधंदे असले पाहिजे हीच भाजपची भूमिका आहे, मात्र आपल्या राज्यातील उद्योग तुम्ही घेऊन जा, असे महाराष्ट्रातील सत्ताधारी शिवसेना दिदींना सांगते आहे काय? हा प्रश्न आहे. महाराष्ट्रातील रोजगार, व्यवसाय, इंडस्ट्रीज इथून घेऊन जाण्यास सत्ताधारी शिवसेना ममतादिदींना मदत करते आहे काय? महाराष्ट्रात काँग्रेसला ना स्थान, ना इज्जत, ना किंमत, ना स्थान, ना स्थिती त्यामुळे काँग्रेसला काय ते त्यांचे त्यांनी ठरवावे. आमचा सवाल महाराष्ट्राचा आहे. महाराष्ट्रातील उद्योग पश्चिम बंगालला पाठवून महाराष्ट्रातील तरुणांना केवळ वडापाव विकायला सांगणार आहात काय? तसेच नुकतीच भिवंडीत बांगलादेशींयावर कारवाई झाली अशा कारवाया पुन्हा करू नका म्हणून सत्ताधारी शिवसेनेने ममतादिदींना शब्द तर दिला नाही ना? पश्चिम बंगालमध्ये विरोधकांच्या ज्या हिंसा केल्या जात आहेत त्याचे धडे तर गिरवले जात नाही ना? असे प्रश्न उपस्थित करून या बैठकीची अधिकृत माहिती आणि इतिवृत्त जाहीर करा, अशी मागणी केली.

आम्हाला जय हिंदू राष्ट्र हे मान्य आहे, ते ममतादिदींना मान्य आहे का? ते मान्य नसेल तर हे शिवसेनेला मान्य आहे का? असा सवाल आमदार शेलार यांनी पत्रकारांनी विचारलेल्या ममतादिदींच्या जय बांगला जय मराठा या घोषणेबाबत केला.

# ओवे कॅम्पमधील पाणी समस्येवर लवकरात लवकर मार्ग काढू

## सभागृह नेते परेश ठाकूर यांचे ग्रामस्थांना आश्वासन

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर येथील ओवे कॅम्प गावातील नागरिकांना जीर्ण झालेल्या पाण्याच्या पाइपलाइनमुळे पाण्याची समस्या अनेक दिवसांपासून भेडसावत आहे. या समस्येसंदर्भात बुधवारी (दि. १) ग्रामस्थांची व पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांची बैठक झाली. या बैठकीमध्ये सभागृह नेते परेश ठाकूर यांनी या समस्येवर लवकरात लवकर मार्ग काढण्यात येईल, असे ग्रामस्थांना आश्वासित केले.



पनवेल महापालिका क्षेत्रातील नागरिकांच्या भेडसावणाऱ्या समस्या सोडवण्यासाठी महापालिका आणि सत्ताधारी नगरसेवक कटिबद्ध आहे. त्यानुसार ओवे कॅम्प गावातील नागरिकांना पाणी पुरवठा करणारी पाइपलाइन जीर्ण झाली आहे. त्यामुळे गावातील नागरिकांना अनेक दिवसांपासून पाण्याची समस्या भेडसावत आहे. या संदर्भात महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत महापालिकेचे अधिकारी, लोकप्रतिनिधी आणि ग्रामस्थांची बैठक झाली. या बैठकीमध्ये नागरिकांच्या समस्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली असून, लवकरात लवकर ही पाइपलाइन बदलून पाण्याच्या समस्येवर तोडगा काढण्यात येईल, असे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी ग्रामस्थांना आश्वासित केले.

या वेळी स्थायी समिती सभापती संतोष शेट्टी, नगरसेवक हरेश केणी, भाजपचे ज्येष्ठ कार्यकर्ते प्रभाकर जोशी, किसान मोर्चाचे रामचंद्र जाधव, श्रीरंग केसारकर, संतोष रेवणे, ओवे ग्रामपंचायतीचे माजी सदस्य सदानंद भातोसे, संदीप साळुंखे, महेश केसारकर, श्रीरंग भातोसे, के. डी. केसारकर, महादेव जाधव यांच्यासह पदाधिकारी, महापालिकेचे अधिकारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

# पनवेल ते अंधेरी रेल्वेसेवा गोरेगावपर्यंत सुरू

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल-अंधेरी रेल्वेसेवा बुधवार (दि. १)पासून गोरेगाव स्थानकापर्यंत धावण्यास सुरुवात झाली असून प्रवासी संघाच्या मागणीला यश आले आहे. पनवेल रेल्वेस्थानकात भारतीय रेल्वेचे सल्लागार समिती सदस्य अभिजित पाटील, प्रवासी संघाचे अध्यक्ष डॉ. भक्तिकुमार दवे यांच्या हस्ते या गाडीला हिरवा झेंडा दाखवण्यात आला.




(छाया : लक्ष्मण ठाकूर)

या वेळी डॉ. दवे यांनी सांगितले की, बोरिवली स्थानकात हार्बर रेल्वेसाठी एक प्लॅटफॉर्म बनवण्याचे काम सुरू आहे. येत्या वर्षभरात काम पूर्ण झाल्यावर गाड्याही वाढतील व पनवेल-बोरिवली फेऱ्या सुरू होतील या दृष्टिकोनातून रेल्वे प्रशासनाकडे प्रवासी संघाच्या वतीने पाठपुरावा सुरू आहे. अभिजित पाटील म्हणाले की, पनवेल रेल्वे स्थानकावरील टॉयलेट्स, बसण्याचे बाक, लिफ्ट, पिण्याच्या पाण्याची सोय आदी समस्यांबाबत पाठपुरावा केला आहे. रेल्वेनेही या समस्या सोडवण्याचे आश्वासन दिले असून त्यादृष्टीने कार्यवाही केली आहे. या वेळी भाजप अल्पसंख्याक मोर्चा प्रदेश सचिव सय्यद अकबर, श्रीकांत बापट, सुदाम पाटील, पत्रकार विजय कडू आदी उपस्थित होते.

ही गाडी सकाळी ५.५७, ६.५३, ७.३९, १०.३७, सायंकाळी ४.३४, ५.०१, ५.२९, ६.३३, ७.३५ अशा वेळापत्रकानुसार सुटेल.

# पनवेल मनपातर्फे १५०हून अधिक मतदार नोंदणी शिबिरे

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिकेच्या निवडणूक विभागाच्या वतीने स्वीप अर्थात पद्धतशीर मतदार साक्षरता, नोंदणी आणि निवडणूक सहभाग मोहीम २०२१ ही ७ ते ३० ऑक्टोबरपर्यंत साजरी करण्यात आली. या कार्यक्रमांतर्गत १५०हून अधिक मतदार नोंदणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये ५५०० हजारांहून अधिक नागरिकांनी मतदार नोंदणी केली. स्वीप कार्यक्रमांतर्गत विविध कार्यक्रम, चर्चासत्र, सामाजिक संदेश देणाऱ्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.



स्वीप कार्यक्रमांतर्गत विविध सोसायट्यांमधून १५० पेक्षा जास्त ठिकाणी एक दिवसीय मतदार नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. खारघर, कामोठे, कळंबोली, पनवेल या चारही प्रभागांमधून जवळपास ६५० हौसिंग सोसायट्यांनी यामध्ये सक्रिय सहभाग घेतला. यामध्ये ३५ सेवाभावी संस्था आणि सामाजिक संस्थांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

विजय पवार, विजय पाटकर, नूतन जैन, जयवंत वाडकर, प्रभाकर मोरे, मेघा घाडगे, अंकुर वाढवे, अनिकेत केळकर, उमेश ठाकूर, प्रणव रावराणे, तुषार साई सनी भूषण मुणगेकर अशा १२ मराठी मनोरंजन सृष्टीतील कलाकारांनी पालिका क्षेत्रातील नागरिकांनी मतदार नोंदणी करण्यासाठी व्हिडीओच्या माध्यमातून नागरिकांना आवाहन केले. याबरोबरच निवडणूक विभागाच्या वतीने ‘उत्कृष्ट जिंगल्स’ स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत नरेश पाटील, मुकेश उपाध्याय, पंकज सूर्यवंशी, सुरज जले विजयी झाले.

या उपक्रमात आयुक्त गणेश देशमुख, उपायुक्त विठ्ठल डाके, सहाय्यक आयुक्त सुवर्णा दखणे, निवडणूक विभाग प्रमुख सदाशिव कवठे, तसेच सर्व प्रभाग अधिकारी यांनी विविध ठिकाणी उपस्थित राहून मतदार नोंदणी करण्यासाठी नागरिकांचा उत्साह वाढविला व सविस्तर मार्गदर्शन केले.

# महापौर निधीसाठी आता ऑफलाइन अर्ज पद्धत

## गरजूंनी लाभ घेण्याचे डॉ. कविता चौतमोल यांचे आवाहन



| अंदाजित खर्च | अर्थसहाय्य |
|---|---|
| १ लाख रु. | ५ हजार रु. |
| १ ते २ लाख रु. | १० हजार रु. |
| २ ते ३ लाख रु. | १५ हजार रु. |
| ३ ते ४ लाख रु. | २० हजार रु. |
| ४ लाख रुपयांच्यावर | २५ हजार रु. |

**पनवेल : प्रतिनिधी**

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी वैद्यकिय कारणांसाठी, तसेच अपघात किंवा नैसर्गिक आपत्तीच्या कारणास्तव पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांसाठी लोकसहभागातून महापौर निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. या निधीचा लाभ गरजूंनी घ्यावा असे आवाहन महापौर डॉ. कविता किशोर चौतमोल यांनी केले आहे. याआधी कोविडमुळे ऑनलाइन पद्धतीने महापौर निधीसाठी अर्ज करण्याचे आवाहन पालिकेने केले होते, परंतु आता ऑफलाइन पद्धतीने अर्ज करण्याचे आवाहन महापौरांनी केले आहे.


महापौर सहाय्यता निधी अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल गरजूंना गंभीर आजारांसाठी (कोविड १९, हृदयरोग, मेंदू संबधित उपचार तसेच शस्त्रक्रिया, कॅन्सर संबधित शस्त्रक्रिया, ल्युकेमीया, थॅलेसीमीया, क्षयरोग, अवयव प्रत्यारोपण, डायलिसिस, बोनमॅरो) आर्थिक मदत करण्यात येईल, तसेच नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या आपत्तीग्रस्तांना, अपघातामुळे मृत्यू किंवा कायमस्वरूपी दुखापत, कायमस्वरूपी अंपगत्व आलेल्यानां आर्थिक मदत करण्यात येईल.

या महापौर निधीचा लाभ घेण्याकरिता महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावरील (वेबसाईटवरील) अर्ज डाऊनलोड करून घ्यावा. हा अर्ज आणि त्यासोबत लागणारी कागदपत्रे महापालिकेला panvelcorporation@gmail.com या ई-मेलवरती पाठवावी किंवा महापौर कार्यालयामध्ये जमा करावी. नागरिकांकडून प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी पालिकेच्या समितीद्वारे केली जाईल. त्यानंतर पात्र गरजूंना अर्थसहाय्य करण्यात येईल.

महापौर सहाय्यता निधी अर्जासोबत वैद्यकिय खर्चाचे अंदाजपत्रक/प्रमाणपत्र डॉक्टारांच्या सही व शिक्क्यासह (खाजगी रुग्णालय असल्यास वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांच्याकडून प्रमाणित करणे आवश्यक आहे.) तहसीलदार कार्यालयाचा उत्पन्नाचा दाखला. रुग्णाचे ओळखपत्र (पमपा हद्दीतील आधारकार्ड, पॅनकार्ड, मतदानाचे ओखळपत्र किंवा पासपोर्ट यापैकी एक) रुग्णाचे रेशनकार्ड. संबधित आजाराचे रिपोर्ट असणे आवश्यक आहे. नगरसेवक शिफारस पत्र अशी कागदपत्रे लागणार आहेत.

## विजय कादबाने पनवेल शहर वरिष्ठ पोलीस निरीक्षकपदी

**पनवेल :** शहर पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ निरीक्षकपदाचा विजय कादबाने यांनी बुधवारी (दि. १) पदभार स्वीकारला.



मावळते वरिष्ठ निरीक्षक अजयकुमार लांडगे यांना सहाय्यक पोलीस आयुक्तपदी पदोन्नती मिळाली असून लांडगे यांनी कादबाने यांच्याकडे पदभार सुपूर्द केला.

खारघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक संदीपान शिंदे, तालुका पोलीस निरीक्षक (गुन्हे) अंकुश खेडकर, गुन्हे शाखा युनिट ३चे सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर पवार, तळोजा वाहतूक विभागाचे पोलीस उपनिरीक्षक सुनील सावंत, मुंबई पोलीस निरीक्षक अनिल पडवळ आदींनी भेट घेऊन तसेच दूरध्वनीद्वारे कादबाने यांचे अभिनंदन केले आणि त्यांना शुभेच्छा दिल्या.

# कामोठे सेक्टर ५मध्ये मुलांना खेळण्यासाठी भूखंड उपलब्ध

## नगरसेवक विजय चिपळेकर यांचा पाठपुरावा

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

कामोठे सेक्टर ५मध्ये मुलांना खेळण्यासाठी भूखंड उपलब्ध करून देण्यात आला आहे. या कामी नगरसेवक विजय चिपळेकर यांनी पाठपुरावा केला असल्याने नागरिकांसह बालकांनी त्यांचे आभार मानले.




पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील कामोठे नोडमधील सेक्टर ५मधील प्लॉट नंबर २२ येथे मोठ्या प्रमाणात डेब्रिज आणि इतर कचरा होता, तसेच या भूखंडावरील खड्डे आणि डेब्रिजचे ढिगारे यामुळे परिसर विद्रूप झाला होता. सेक्टर ५ मधील गायत्री निवास सोसायटीचे भारत पन्हाळकर, पवित्रा अपार्टमेंटमधील रोशन येवले, लक्ष्मण सकपाळ, सूर्या या जागरूक नागरिकांनी या प्लॉटवरील घाण आणि कचरा स्वच्छ करण्याची मागणी नगरसेवक विजय चिपळेकर यांच्याकडे केली.

नगरसेवक चिपळेकर यांनी रहिवाशांच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत सिडको अधिकाऱ्यांकडे या जागेच्या स्वच्छतेबद्दल पाठपुरावा केला आणि सिडकोच्या सहकार्याने मैदानातील डेब्रिज आणि इतर कचरा यांची स्वच्छता केली. यासोबत जेसीबीचा उपयोग करून जागेचे सपाटीकरण केले. कचरा डेब्रिजमुळे अस्वच्छ असणारा भूखंड आता सपाटीकरणामुळे खेळण्यायोग्य झाला असल्याने मुलांना खेळण्यासाठी जागा उपलब्ध झाली. त्यामुळे नगरसेवक विजय चिपळेकर यांनी केलेल्या सहकार्याबद्दल रहिवाशांनी समाधान व्यक्त केले.

# उरणमध्ये शाळा सुरू; विद्यार्थ्यांचे स्वागत

**उरण : वार्ताहर**

राज्यातील शाळांचे सर्व वर्ग १ डिसेंबर रोजी सुरू करण्याचा निर्णय राज्य सरकारने जाहीर केला आहे. त्यानुसार उरण नगर परिषदचे महाराष्ट्र भूषण डॉ. नानासाहेब विष्णू धर्माधिकारी शाळा क्र. १ येथे कोविड निर्बंधानंतर पहिली ते सातवीचे प्रत्यक्ष वर्ग सुरू करण्यात आले. त्यानिमित्ताने विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले.

या वेळी उरण नगर परिषद शिक्षण विभागाचे सभापती रवी भोईर, प्रशासन अधिकारी मधुकर सूर्यवंशी, नगरसेवक राजेश ठाकूर, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष उज्वला पांचाळ, मुख्याध्यापिका भारती खेडेकर आणि शाळेतील सर्व शिक्षक उपस्थित होते.



# माथेरानमध्ये पिण्याच्या पाण्याची दरवाढ

**कर्जत : बातमीदार**

माथेरानमधील महाराष्ट्र जीवन प्राधिकारणाकडून होत असलेल्या भरमसाठ पाणी दरवाढी विरोधात माथेरान येथील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने एल्गार पुकारला आहे. हुतात्मा भाई कोतवाल यांच्या जयंतीच्या दिवशी बुधवारी (दि. १) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाविरोधात भर वाऱ्यापावसात माथेरानमधील मध्यवर्ती ठिकाण असलेल्या श्री राम चौक येथे उपोषण सुरू केले आहे.



**‘मजीप्रा’ विरोधात मनसेचे उपोषण**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने येथील नळ जोडणी ग्राहकांना कोणतेही पत्र अथवा पूर्वसूचना न देता पाणी बिलामध्ये केलेल्या दरवाढीमुळे माथेरानकर हैराण झाले आहेत. येथील नागरिकांनी माथेरान मनसे शहर अध्यक्ष संतोष कदम यांच्याकडे नाराजी प्रकट करत तक्रारी केल्या. जनतेवर होणाऱ्या अन्यायाविरोधात वाचा फोडण्यासाठी मनसेने उपोषणाचे हत्यार उपसले आहे. या उपोषणाबाबत मनसेने १५ दिवस अगोदर एमजेपीला पूर्वकल्पना दिली होती, मात्र यावर कोणताही ठोस निर्णय न झाल्यामुळे माथेरान मनसे शहर अध्यक्ष संतोष कदम यांनी उपोषण सुरू केले आहे. या उपोषणाला अनेकांनी पाठिंबा जाहीर केला आहे.

# कामोठ्यातील बंद पथदिवे दुरुस्त करा; भाजप युवा मोर्चाची सिडकोकडे मागणी

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

कामोठे वसाहतीमधील अनेक ठिकाणी पथदिवे बंद अवस्थेत किंवा नादुरुस्त आहेत ते दुरुस्त करावे. जे पथदिवे बंद आहेत तिथे नवीन पथदिवे बसवण्यात यावेत, अशी मागणी भारतीय जनता युवा मोर्चा कामोठे मंडलतर्फे हर्षवर्धन पाटील यांनी केली आहे. या संदर्भात त्यांनी सिडकोच्या कामोठे येथील कार्यालयात जाऊन तेथील अभियंत्यांना निवेदन दिले.



कामोठे वसाहतीमधील अनेक ठिकाणी स्ट्रीट लाईट बंद अवस्थेत किंवा नादुरुस्त आहेत. कामोठे शहरातील रस्ते व गार्डन परिसरात वृद्ध, गृहिणी, बालके मोठ्या प्रमाणात येत असतात, मात्र संध्याकाळी ६ नंतर अंधार झाल्यावर लहान मोठ्या रोडच्या कोपऱ्यावर व गार्डनमध्ये अल्पवयीन मुलांचे टोळके, तसेच शाळा कॉलेजची तरुण मुले सिगारेट, चरस गांज्या, चिलीम आदी पिण्यासाठी या ठिकाणी येतात. त्याचप्रमाणे अनेक पुरुष व तरुण मंडळी दारू पिण्यासाठी या ठिकाणी येत आहेत. यामुळे या ठिकाणी महिला वर्ग व नागरिक अंधार झाल्यावर भीतीपोटी निघून जातात.

अंधारामुळे या भागात गुन्हेगारीसुद्धा वाढत आहे. या गार्डनमध्ये व समोरील रस्त्यांवर पोलिसांची गस्त वाढवावी व बंद असलेल्या पथदिव्यांची दुरुस्तीची व्यवस्था लवकरात लवकर करावी. एखादी घटना घडण्यापूर्वी उपाययोजना करावी. जे पथदिवे बंद किंवा नादुरुस्त आहेत ते दुरुस्त करावे, असे हर्षवर्धन पाटील यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे.


## ‘ओमायक्रॉन’च्या पार्श्वभूमीवर प्रशासन सतर्क

# पनवेल, नवी मुंबईत महापालिकांची खबरदारी

**नवी मुंबई, पनवेल : वार्ताहर**

कोविडच्या ओमायक्रॉन या नव्या धोकादायक विषाणूचा संसर्ग रोखण्यासाठी पनवेल पालिका आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका क्षेत्रातील ३७ रुग्णालयांची ऑनलाइन पद्धतीने बैठक घेण्यात आली. या वेळी कोविड रुग्णालयांना सतर्क राहाण्याच्या सूचना देण्यात आल्या. याचप्रमाणे नवी मुंबई पालिका प्रशासन सतर्क झाले आहे. चाचणी, लसीकरण आणि विनामुखपट्टी फिरणाऱ्या नागरिकांवर तत्काळ कारवाई करण्याचे प्रमाण वाढविण्याचे आदेश पालिका आयुक्त अभिजित बांगर यांनी दिले आहेत.

तिसऱ्या लाटेच्या पार्श्वभूमीवर सर्व यंत्रणा अद्ययावत करण्याच्या सूचना आयुक्त देशमुख यांनी या वेळी कोविड रुग्णालयांना देण्यात आल्या, तसेच शासन नियमांनुसार महापालिका हद्दीतील कोविड रुग्णालयांनी त्यांचे फायर, स्ट्रक्चरल ऑडिट आणि ऑक्सिजन पुरवठाविषयीची माहिती पालिकेला सादर न करणाऱ्या रुग्णालयांना कारणे दाखवा नोटीस बजावली जाणार आहे. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या रुग्णालयांवर पालिकेच्या वतीने दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. संशयित पॉझिटिव्ह रुग्णांची माहिती पालिकेला कळविण्याच्या सूचनाही रुग्णालयांना देण्यात आल्या. पालिका क्षेत्रातील प्रयोगशाळांस ओमायक्रॉन/बी१.१.५२९ या नमुन्याबाबतची माहिती पालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागास देण्याविषयीच्या सूचना या वेळी देण्यात



आल्या. सर्व खाजगी रुग्णालयांना ओमायक्रॉन विषाणूविषयीची माहिती सांगून या पार्श्वभूमीवर तिसऱ्या लाटेसंदर्भात सर्व तयारी करून सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या.

या बैठकीस पनवेल पालिका उपायुक्त सचिन पवार, मुख्य वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी, वैद्यकिय अधिकारी डॉ. भक्तराज भोईटे, डॉ. सुरेश पंडित, रूहिता शेलार, तसेच पालिका क्षेत्रातील कोविड रुग्णालयांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

नवी मुंबई पालिकेतर्फे दिवसाला यापूर्वी करण्यात येणाऱ्या सात हजार चाचण्यांची क्षमता कायम ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत. दिवसाला चाचण्यांचे प्रमाण वाढविण्यात यावे त्याचप्रमाणे लसीकरणासाठी गर्दीच्या ठिकाणी पालिकेच्या रुग्णवाहिकाद्वारे हे लसीकरण करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. यापूर्वी पालिकेने या दंडात्मक कारवाईतून तीन कोटींपेक्षा जास्त रक्कम वसूल केली आहे. मुखपट्टी झुगारून फिरणाऱ्या नागरिकांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याने कारवाईचा बडगा वाढणार आहे. विनामुखपट्टी कारवाईची सुरुवात एपीएमसी बाजारातून होणार आहे.

> **ऐरोली येथे १९० अत्यवस्थ व प्राणवायू रुग्णशय्या, तर नेरूळ येथील १७८ रुग्णशय्या सज्ज ठेवण्यात येणार आहेत. नव्या विषाणूमुळे सतर्कता बाळगण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यामुळे शहरातील कोरोना काळजी केंद्र, कोरोना रुग्णालये व मुखपट्टी न घालणाऱ्यांवर कारवाई करणारी पथके पुन्हा सज्ज करण्यात आली आहेत.**
>
> **–अभिजित बांगर, आयुक्त, नवी मुंबई महापालिका**

याशिवाय पालिकेने यापूर्वीच १४ कोविड काळजी केंद्र, ६२५ अत्यवस्थ व प्राणवायू रुग्णशय्या तयार ठेवण्यात आलेल्या आहेत.

## नेवाळीजवळील खराब रस्त्याची डागडुजी सुरू; भाजपचा पाठपुरावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाने आणि नगरसेवक समीर ठाकूर यांच्या पाठपुराव्याने नवीन पनवेलहून नेवाळीकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कामाला सुरुवात झाली आहे.

नवीन पनवेलकडून नेवाळी, टेंभोडेकडे जाणारा रस्ता अनेक दिवसांपासून अत्यंत खराब झाला होता. या रस्त्यावरील खड्ड्यांमुळे नागरिक, प्रवासी व वाहनचालकांना ये-जा करण्यास त्रास होत असे. या संदर्भात मोतीराम काथारा व अनिकेत काथारा यांनी केलेल्या मागणीची आमदार प्रशांत ठाकूर आणि नगरसेवक समीर ठाकूर यांनी तत्काळ दखल घेत सकारात्मक चर्चा केली. त्यानुसार नगरसेवक ठाकूर यांनी स्वतः या रस्त्याची



पाहणी केली आणि झेनिथ कन्ट्रक्शनच्या कॉन्ट्रॅक्टरला हा रस्ता लवकरात लवकर बनवून द्यावे, असे सांगितले. यानुसार झेनिथ कन्ट्रक्शन यांच्यामार्फत रस्त्याच्या कामाला सुरुवात झाली आहे.

याबद्दल नागरिकांनी आमदार प्रशांत ठाकूर आणि नगरसेवक समीर ठाकूर यांचे आभार मानले आहेत.

## ‘सीकेटी’च्या विद्यार्थ्यांची पनवेल महापालिका मुख्यालयाला भेट

### मतदार साक्षरता आणि निवडणूक सहभाग मोहीम

**पनवेल : प्रतिनिधी, वार्ताहर**

पनवेल महानगरपालिका निवडणूक विभागाच्या वतीने स्वीप २१-मतदार साक्षरता आणि निवडणुकीत सहभाग मोहिमेंतर्गत महाविद्यालयाच्या निवडक विद्यार्थ्यांनी पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयास भेट दिली. या वेळी मतदार साक्षरता आणि निवडणूक व नोंदणी, तसेच महापालिकेच्या कामकाजाबद्दल उपायुक्त विठ्ठल डाके यांनी माहिती विषद केली.

उपस्थित विद्यार्थ्यांना महापालिका कार्यपद्धती व स्पर्धा परीक्षेतील आव्हानांसंदर्भात सहाय्यक आयुक्त सुवर्णा दखने यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे मुख्य कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक सूर्यकांत परकाळे



यांनी महाविद्यालयात होत असलेल्या वेगवेगळ्या उल्लेखनीय, नावीन्यपूर्ण व विद्यार्थी केंद्रित उपक्रमांची माहिती दिली, तसेच विद्यार्थ्यांना जबाबदार नागरिक घडविण्यात महाविद्यालयाचे योगदान उधृत केले. त्याचबरोबर महाविद्यालयाच्या विद्यापीठस्तरीय, तसेच राज्यस्तरीय देदिप्यमान कारकिर्दीचा मागोवा घेतला. या वेळी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांचे विद्यार्थी केंद्रित उपक्रमांच्या आयोजनामध्ये असणाऱ्या मार्गदर्शनाचा उल्लेख केला. शेवटी पनवेल महापालिकेने मुख्यालयास भेट देणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थिनींचा प्रशंसा प्रमाणपत्र देऊन सत्कार केला.

या कार्यक्रमात महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे मुख्य कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक सूर्यकांत परकाळे, कार्यक्रमाधिकारी प्राध्यापक गणेश साठे, प्राध्यापिका अपूर्वा ढगे व प्राध्यापक आकाश पाटील, पालिका निवडणूक विभाग सदाशिव कवठे, विजय चव्हाण यांनी सहभाग नोंदविला.

या नावीन्यपूर्ण उपक्रमात सहभाग नोंदविल्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. सिद्धेश्वर गडदे यांनी कौतुक केले.

## गुरचरणातील घरे नियमित करण्याची मागणी

### ना. कपिल पाटील यांना निवेदन

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

वन व गुरचरण विभागामध्ये गरजेपोटी बांधलेली घरे नियमित करत गावठाण विस्तार होण्यासाठी कसळखंड ग्रामपंचायतीच्या सरपंच माधुरी अनिल पाटील यांनी केंद्रीय पंचायतराज मंत्री कपिल पाटील यांना निवेदन दिले आहे.

कसळखंड ग्रामपंचायतीची स्थापना १९५६ रोजी झाली असून आतापर्यंत गावठाण विस्तार झालेला नाही. या ग्रामपंचायतीची लोकसंख्येची घनता आणि वाढ पाहिली तर दुपटीने वाढली आहे. सतत वाढत असलेल्या लोकसंख्येमुळे व भविष्यातील वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे लोकांनी वन व गुरचरण विभागांमध्ये लोकांच्या गरजेपोटी घरे बांधलेली आहेत. जुने गावठाणामध्ये लोकांना घरे बांधण्यासाठी जागा शिल्लक राहिली नसल्याकारणाने



गावठाणाच्या बाजूस लागून असलेल्या काही सरकारी जागेत गुरचरण वन विभाग गावातील गवनी, शेणवडी येथे गरजेपोटी बांधकामे केली गेली आहेत. तीच बांधकामे आज शासनामार्फत अनधिकृत व बेकायदेशीर ठरवली जात आहेत. त्यामुळे गावठाणाची मोजणी आणि वाढ व्हावी व जी अतिक्रमणे आहेत ती नियमित करावी, गुरचरणात गरजेपोटी बांधलेली घरे नियमित करावीत, अशी मागणी माधुरी पाटील यांनी केली आहे.

## गव्हाण विद्यालयात दहावीच्या परीक्षेसाठी प्रवेश अर्ज भरण्यास प्रारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्यु. कॉलेजमधील इयत्ता दहावी (एसएससी) बोर्ड परीक्षा २०२२ या परीक्षेसाठी प्रवेश अर्ज भरण्याचा प्रारंभ विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन व रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी व समन्वय समिती सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते करण्यात आला. या वेळी विद्यार्थ्यांना मिठाई वाटप करून शुभेच्छा देण्यात आल्या.



अध्यक्षीय भाषणात अरुणशेठ भगत यांनी विद्यार्थ्यांनी गुणवत्तेशी तडजोड न करता आपले व्यक्तिमत्त्व विकसित करावे व विद्यालयाच्या उज्ज्वल निकालाची यशस्वी परंपरा कायम राखावी, असे आवाहन केले.

या वेळी विद्यालयाच्या प्राचार्या साधना डोईफोडे, रयत शिक्षण संस्थेचे लाईफवर्कर व समन्वय समिती सदस्य रवींद्र भोईर, उपमुख्याध्यापक जगन्नाथ जाधव, परीक्षा विभाग प्रमुख चित्रलेखा पाटील, गुरुकुल प्रमुख संदीप भोईर, पालक शिक्षक संघाचे सचिव देवेंद्र म्हात्रे आदींसह विद्यार्थी उपस्थित होते.

रयत शिक्षण संस्थेचे लाईफवर्कर व समन्वय समिती सदस्य रवींद्र भोईर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. चित्रलेखा पाटील यांनी सूत्रसंचालन केले, तर उपमुख्याध्यापक जगन्नाथ जाधव यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## खारघर डोंगरावरील वणव्यात वनसंपदा खाक

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल जवळील खारघर येथील ओवे डोंगरावर मोठ्या प्रमाणात वणवा पेटला. या वणव्यात मोठ्या प्रमाणात वनसंपदा खाक झाली असून, वन्यप्राण्यांच्या जिवालाही धोका निर्माण झाला आहे. डोंगरावर पर्यटकांच्या नावाखाली येणाऱ्या मद्यपींकडून वणवा पेटविला जात असल्यामुळे वनविभाग कर्मचारी हतबल झाले आहेत.

खारघर सेक्टर ३४, तळोजा मध्यवर्ती कारागृह ते तळोजा तलाव लगत असलेल्या डोंगरावर मोठ्या प्रमाणात वनसंपदा आस्तित्वात आहे. महाराष्ट्र राज्य सरकारच्या वृक्ष लागवड उपक्रमांतर्गत मोठ्या प्रमाणात ओवे डोंगरावर वृक्षारोपण केले आहे, मात्र या वनसंपदेचे संवर्धन होण्याऐवजी दरवर्षी हिवाळ्यात लागणारा वणवा आणि वन्यप्राण्यांच्या शिकारीसाठी आग लागण्याच्या घटना समोर येत असतात. नोव्हेंबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात खारघर सेक्टर ३४ लगत असलेल्या डोंगरावर वणवा लागला होता. या वेळी काही झाडे जळून खाक झाली होती. खारघरमधील डोंगरावर दिवाळीनंतर लागणाऱ्या वणव्यामुळे मोठ्या प्रमाणात वनसंपदेची हानी होत असते. त्यामुळे नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन पर्यावरण प्रेमींनी केली आहे. खारघर



आणि ओवे डोंगर परिसरातील वनसंपदा नष्ट होवू नये म्हणून डोंगरलगत असलेल्या आदिवासी पाड्यात सभा घेवून नागरिकांमध्ये जनजागृती केली जाते. त्यामुळे ग्रामस्थांकडून सहकार्यदेखील मिळते.

निसर्गरम्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या डोंगरावर दरदिवशी अनेक पर्यटक येतात. काही लोक पर्यटकांच्या नावाखाली दारु पार्टी करताना सिगारेट पिऊन सिगारेट विझविण्याऐवजी फेवून पसार होतात. हे प्रकार संध्याकाळी होतात. त्यामुळे आग विझविण्यात मोठी अडचण निर्माण होते. नागरिकांनी डोंगरावर आग न लावता वनसंपदा सुरक्षित राहावी यासाठी वन विभागाला सहकार्य करण्याची गरज आहे, असे वन विभाग कर्मचाऱ्यांनी सांगितले.

## लोकनेते रामशेठ ठाकूर कॉलेजची भूमी चिबडे वक्तृत्व स्पर्धेत प्रथम

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

सुधागड एज्युकेशन सोसायटी पालीचे संस्थापक अध्यक्ष स्वर्गीय शिक्षण महर्षी दादासाहेब लिमये यांच्या ११२व्या जयंतीनिमित्त कोकण विभागीय कनिष्ठ महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन मंगळवारी (दि. ३०) करण्यात आले होते.

सुधागड विद्यासंकुल कळंबोली येथील सभागृहात झालेल्या या वक्तृत्व स्पर्धेत कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर ज्युनियर कॉलेजच्या भूमी राजाराम चिबडे हिचा प्रथम क्रमांक आला.

वक्तृत्व स्पर्धेसीठी शिक्षण-ऑनलाइन की ऑफलाइन, बदलते निसर्ग चक्र, कोरोना आणि सामाजिक अर्थव्यवस्था, कर्मयोगी शिक्षणमहर्षी स्व. दादासाहेब लिमये, आपत्ती व्यवस्थापन एक सामाजिक जबाबदारी हे विषय ठेवण्यात आले होते. या स्पर्धेला कोकण विभागातून चांगला प्रतिसाद लाभला.

या स्पर्धेत द्वितीय क्रमांक प्रतीक्षा संजय नरसाळे (सु.ए.सो. ज्यनियर कॉलेज, कळंबोली) तर तृतीय क्रमांक विवेक विलास डुबे (ग. बा. वडेर हायस्कूल व वसंतशेठ गणेशमल ओसवाल ज्युनियर कॉलेज, पाली) या विद्यार्थांनी मिळविला. यशस्वी विद्यार्थांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

या वेळी सुधागड विद्या संकुल कळंबोलीचे प्राचार्य राजेंद्र पालवे, उपप्राचार्य बी. डी. कसबे, उपमुख्याध्यापिका सरोज पाटील स्पर्धेचे परीक्षक प्रा. रणदिवे (एन. एन. पालीवाला ज्युनिअर कॉलेज, नवीन पनवेल), प्रा. प्रभू (सेंट जोसेफ ज्युनिअर कॉलेज, कळंबोली), मिश्रा (सुधागड विद्या संकुल, कळंबोली), कार्यालय अधीक्षक दत्ता शिंदे, पर्यवेक्षक व्ही. बी. भद्रशेट्टी, एस. एन. भोसले, पी. पी. जाधव, बी. एस. माळी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. कौशल्या मोमीनगिरे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार प्रा. कुमूदिनी म्हात्रे यांनी मानले.



## चिर्ले-वेश्वी रस्त्यावर ट्रेलरचा अपघात



**उरण : प्रतिनिधी**

चिर्ले-वेश्वी रस्त्यावर कंटेनर टेलरला अपघात झाला असून या अपघातात मोटरसायकलस्वार थोडक्यात बचावला आहे. हा अपघात बुधवारी (दि. १) सकाळी कोटक यार्डजवळ झाला.

नवी मुंबई वाहतूक यंत्रणेने दास्तान फाटा ते दिघोडे या नागरिकांच्या रहदारीच्या रस्त्यावर सकाळी अवजड वाहनांच्या रहदारीला प्रवेशबंदी घातल्याचा निर्णय घेण्यात आला आहे, मात्र नवी मुंबई वाहतूक यंत्रणेच्या आणि शासनाच्या निर्णयाला हरताळ फासण्याचे काम या परिसरात होत आहे. सकाळी अवजड वाहनांची रेलचेल या रस्त्यावर सुरू केली आहे. त्यात बुधवारी सकाळी या रस्त्यावरून जाणाऱ्या कंटेनर टेलरला अपघात होण्याची घटना चिर्ले गावाजवळील कोटक यार्डजवळ घडली. या अपघातात मोटरसायकलस्वार थोडक्यात बचावला.

दरम्यान, दास्तान फाटा ते दिघोडे या रस्त्यावर अपघाताचे प्रमाण वाढले आहे. या रस्त्यावर सकाळी अवजड वाहनांना बंदी घालण्यासाठी नवी मुंबई वाहतूक यंत्रणेने पुढाकार घ्यावा, अशी मागणी भाजप उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष निळकंठ घरत यांनी केली आहे.

## कालिवली येथे महिलांसाठी शिवणकाम प्रशिक्षण उपक्रम

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत महिलांना मोफत तीन महिने शिवणकाम शिकविले जाते. या पार्श्वभूमीवर रसायनी-पाताळगंगा अतिरिक्त एमआयडीसी हद्दीतील पेहचान प्रोजेक्ट, इदेमिस्तु ल्युब प्रा.लि. व येरळा प्रोजेक्ट्स सोसायटी सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने कालिवली येथे शिवणकाम प्रशिक्षण उद्घाटन करण्यात आले. यासोबत तीन महिने शिवणकाम प्रशिक्षण पूर्ण केलेल्या महिलांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.

शिवणकाम प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन चावणे ग्रामपंचायतीच्या ग्रामसेविका वैशाली जाधव यांच्या हस्ते झाले. या वेळी ग्रामसेविका जाधव यांनी उपस्थित महिलांना मार्गदर्शन करताना सांगितले की, जीवनामध्ये अशी संधी पुन्हा मिळत नाही. या संधीचा पुरेपूर वापर करून घ्यावा. उद्योगामध्ये सामील झाले तर त्या व्यक्तीला आपले जीवनमान सुधारण्याची संधी मिळते. शिवणकाम शिकल्याने महिलांना घरबसल्या काही अंशी रोजगाराची संधी मिळणार आहे.

सवणे, चावणे व मोदी माळवाडी येथील शिवणकाम प्रशिक्षण पूर्ण केलेल्या २८ महिलांना प्रशिक्षण प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. या वेळी बाजीराव मेंगाने, साक्षी पाटील, अस्मिता कचरे, प्रशिक्षिका समीक्षा, जोस्ना देशमुख आदी उपस्थित होते.



## संपादकीय

# दिदींच्या दौऱ्याची गोष्ट


विरोधकांची मोट बांधण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा ममता बॅनर्जी यांनी मुंबई दौऱ्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्याशी चर्चा केल्यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना काँग्रेसवर यथेच्छ तोंडसुख घेतले. त्यांचा थेट रोख राहुल गांधी यांच्या नेतृत्वावर होता. काँग्रेसप्रणीत यूपीए आता अस्तित्वातच नसल्याचा दावा करून काँग्रेसच्या केंद्रीय नेतृत्वाबद्दलच त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ममता दिदींच्या मुंबई दौऱ्यानंतर राजकीय पंडितांना असा प्रश्न पडला आहे की, दिदींचा मुंबई दौरा भाजपच्या विरोधात होता की काँग्रेसच्या विरोधात?

**काही महिन्यांपूर्वी घरच्या मैदानावर म्हणजेच पश्चिम बंगालमध्ये भारतीय जनता पक्षाचा पुरता धुव्वा उडवून पुन्हा सत्तेवर आलेल्या तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा ममता बॅनर्जी यांचा मुंबई दौरा चांगलाच गाजला. दोन दिवसांच्या या दौऱ्यामध्ये ममता दिदी नेमके कोणते राजकारण साधणार याचे अंदाज प्रसारमाध्यमांमार्फत बांधले जात होते. आधी दिल्लीचा दौरा आटोपून मुंबईत आलेल्या दिदींनी मुंबईमध्ये मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्याशी भेटीगाठी करण्याचे ठरवले होते, परंतु मुख्यमंत्री ठाकरे मणक्यावरील शस्त्रक्रियेनंतर अजूनही इस्पितळात उपचार घेत आहेत. त्यामुळे त्यांची भेट होऊ शकली नाही. त्याऐवजी निवासी हॉटेलातच शिवसेनेचे प्रवक्ते खासदार संजय राऊत आणि पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांच्या सदिच्छा भेटीवर त्यांनी समाधान मानून घेतले. बुधवारी दुपारी ठरल्याप्रमाणे शरद पवार यांच्या सिल्व्हर ओक या निवासस्थानी त्या येऊन थडकल्या. त्यांच्याशी झालेल्या तासभराच्या चर्चेनंतर दिदींनी प्रसारमाध्यमांच्या समोर येऊन काही स्पष्ट विधाने केली. ती ऐकून काँग्रेसच्या नेत्यांची झोप उडाली असेल. राष्ट्र पातळीवरील सत्ताधारी भारतीय जनता पक्षाच्या विरोधात समर्थपणे उभ्या ठाकणाऱ्या नेत्या म्हणून ममता दिदींची देशभरात ओळख आहे. पश्चिम बंगालमध्ये त्यांनी भाजपची डाळ शिजू दिली नाही हे अगदी खरे, परंतु शेजारील त्रिपुरामध्ये भाजपने त्यांना बिलकुल पाय रोवू दिले नाहीत हेदेखील तितकेच खरे आहे. त्रिपुरामध्ये झालेल्या स्थानिय स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये तृणमूल काँग्रेसने प्रचंड जोर लावला आणि भाजपला कडवी टक्कर देण्याची भाषा केली. प्रत्यक्षात तेथे तृणमूलला निव्वळ एक जागा मिळाली. राष्ट्रीय नेतृत्वाची स्वप्ने बघणाऱ्या ममता दिदींना दिल्ली गाठण्यापूर्वी खूप मोठा पल्ला मारावा लागणार आहे हेच त्रिपुरातील निकालातून स्पष्ट झाले. जो पक्ष लढण्याच्या प्रयत्नातच नाही, त्या पक्षाला सोबत घेऊन काय फायदा, असे उद्गार त्यांनी मुंबईत काँग्रेसबाबत काढले. जे नेते कायम परदेशात जातात, त्यांचे काय करायचे असा टोला त्यांनी कुणाचेही नाव न घेता लगावला. तो अर्थात खासदार राहुल गांधी यांच्यासाठी होता हे वेगळे सांगायला नको. विरोधकांची एकजूट ही काळाची गरज असून नेतृत्वाचा मुद्दा नंतर उपस्थित होतो असे त्या म्हणाल्या. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनीही त्यास सहमती दर्शवली. या संपूर्ण दौऱ्यात दिदींनी काँग्रेसचे जेवढे नुकसान केले, तेवढे भाजपचे देखील झाले नाही. ममता दिदींच्या या थेट वक्तव्यांनी काँग्रेस नेतृत्व अस्वस्थ झाले असेल, तर त्यात नवल नाही. त्यांच्या मुंबई दौऱ्यामुळे भाजपने अस्वस्थ होण्याचे काहीच कारण दिसत नाही. काँग्रेस पक्षाने मात्र वेळीच सावध होणे गरजेचे आहे. दिदींच्या मुंबई दौऱ्याचा तूर्त तरी एवढाच मथितार्थ आहे.**

# सोनारकाम व्यवसायात 'हॉलमार्क'ची गुंतागुंत

रायगड जिल्ह्यातील सर्वात मोठा सोन्याचा दागिना म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांचे ३२ मणांचे सिंहासन. ते सिंहासन घडविण्यासाठी रायगड जिल्ह्यातील पोलस्यपूर म्हणजे पोलादपूर येथे कर्नाटक हुबळी येथील कारागिर आणले गेले होते. सोने या धातूला स्वच्छ करून दागिने घडविताना त्याची तन्यता आणि वर्धनीयता या गुणधर्माचा पुरेपूर वापर करणारा कारागिर हा सोनारकामातील तरबेज मानला जातो, मात्र आता हॉलमार्कच्या सक्तीने हा व्यवसाय मेटाकुटीस येणार आहे. या हॉलमार्क पद्धत अवलंबल्याने सर्वसामान्य कारागिरांना पारंपरिक व्यवसायाला नव्या पद्धतीने परिपूर्ण करावे लागणार आहे.





भारतीय मानक ब्युरो (बीआयएस) सहकार्याने सोनार व्यावसायिक, ज्वेलर्स, सुवर्णकार कारागीर बांधव यांच्यासाठी शासकीय नियमांचे योग्य आणि अचूक मार्गदर्शन, सहकार्य व्हावे यासाठी सुवर्णकारांच्या विविध संघटना कार्यरत आहेत. यामध्ये हॉलमार्किंग सेंटरनजीकच्या जिल्ह्यांमध्ये असल्यामुळे सर्वांना बीआयएस प्रमाणपत्र घेणे बंधनकारक आहे. ज्यांनी बीआयएसमध्ये रजिस्ट्रेशन केले आहे. त्यांनी लवकरात लवकर ओल्ड हॉलमार्किंग स्टॉक डिक्लेरेशन करायचा आहे. डिक्लेरेशनसाठी लागणारी वेबसाईट mubi2bis.gov.in अशी आहे.

ज्यांनी अजून हॉलमार्किंग ओल्ड स्टॉक डिक्लेरेशन केलेले नाही, अशा दुकानांमध्ये व्हिजिट झाल्यानंतर अधिकारी बीआयएस डिपार्टमेंट कळवणार आहेत. त्यांच्याकडून आलेल्या नोटीसला पुन्हा उत्तर द्यावे लागणार आहे. रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या तीन जिल्ह्यांमध्ये १ डिसेंबरपासून जी दुकाने बीआयएसकडे रजिस्टर आहेत, त्या दुकानांमध्ये संबंधित अधिकारी व्हिजिट करणार आहेत. ते प्रत्येक दुकानातून एक सॅम्पल असे दिवसाला पाच सॅम्पल गोळा करणार आहेत. ज्यांचे दुकान बीआयएसमध्ये रजिस्ट्रेशन केले आहे, त्यांनी दुकानांमध्ये बीआयएस मानक पथप्रदर्शकचा लोगो लावणे बंधनकारक आहे. दुकानांमध्ये वजन काटा ०.०१ चा असणे बंधनकारक आहे. ग्राहकांना हॉलमार्किंग लोगो दाखवण्यासाठी दुकानांमध्ये दुर्बिण ठेवणे बंधनकारक आहे. दुकानांमध्ये बीआयएस सर्टिफिकेट दिसेल अशा ठिकाणी लावायचे आहे. ज्यांनी अजूनही बीआयएसमध्ये रजिस्ट्रेशन केले नाही, त्यांच्या माहितीसाठी बीआयएस सर्व फी माफ केली आहे. दोन ग्रॅमच्या खालील दागिन्यांना हॉलमार्किंग बंधनकारक नाही. बीआयएस रजिस्ट्रेशन नाही पण दुकान चालू आहे, अशा दुकानदारांना दोन लाखाच्या वर दंड आहे आणि कायदेशीर शिक्षेसाठी पात्र आहेत.

ऑल इंडिया ज्वेलरी अँड गोल्डस्मिथ फेडरेशनचे प्रेसिडेंट पंकज अरोरा यांच्या मते, ज्वेलरी सराफी व्यवसायासाठी बीआयएस मानक घेण्याकरिता केंद्र सरकारने दोन वेळा सवलत दिली होती. आता फेडरेशनकडूनही सरकारकडे अवधी मागितला जाणार नाही. त्यामुळे बीआयएस मानक घेण्यापासून गत्यंतर नाही. योग्य सरकारी अधिकारी हॉलमार्क नसलेल्या दागिन्यांची विक्री करणाऱ्या सराफी व्यावसायिकावर धाडी घालून विना हॉलमार्कच्या सोन्यापासून बनविलेल्या दागिन्यांवर जप्ती कारवाई करू शकणार आहेत. १ डिसेंबरपासून केवळ १८,२२,२४ कॅरेटस् सोन्याचे हॉलमार्कचे दागिने विकता येणार आहेत. गेल्या १ जूनपासून गोरखपूरसह २५६ शहरांमध्ये हॉलमार्कचे नियम लागू करण्यात आले आहेत.

**खबरबात**
**शैलेश पालकर**

व्यापाऱ्यांच्या मागणीवरून सरकारने सर्वांना लवकरात लवकर सर्व दागिने हॉलमार्कचे करण्यासाठी सवलत दिली होती. राजकोट, कोलकाता, मुंबई, दिल्ली आणि कोईम्बतूर येथील व्यापारी गोरखपूर सराफा बाजारातून दागिने खरेदी करतात. दरवर्षी ४० लाखांचा टर्नओव्हर रजिस्ट्रेशन करण्याची अपरिहार्यता असल्याने व्यापारीवर्गासाठी हा नियम आता अधिकच जाचक होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. राजकोट, कोलकता, मुंबई, दिल्ली या शहरात गोल्ड मॅन्युफॅक्चरिंग हब आहेत. पूर्वी सर्वत्र केडीएम सोन्याचे सोल्डरिंग म्हणजे डाग लावण्याचे काम सुरू असायचे ते आता हॉलमार्कमुळे इडियम सोन्यापासून सोल्डरिंग करण्याची गरज आहे.

या नवीन नियमांची अंमलबजावणी केवळ सराफी व्यावसायिकांपुरतीच नसून यासंदर्भात ग्राहक जागृतीचीही गरज निर्माण होणार आहे. यापुढे ग्राहकांनी हॉलमार्कचे दागिनेच खरेदी करण्याची गरज आहे. यासाठी पक्की पावती आणि एसक्यूआयडी दुकानदार सुवर्णकार व्यावसायिकाकडून घेण्याची गरज आहे. दागिन्याची शुद्धता आणि कॅरेट पावतीवर नमूद असण्याची गरज असून बीआयएसचा त्रिकोणी हॉलमार्क दागिन्यावर दिसून आला पाहिजे. लेसमार्कचा शिक्का बिलावर दिसून येण्याची गरज आहे. ग्राहकाला संशय वाटल्यास त्याने दागिन्याची हॉलमार्क सेंटरवर तपासणी करून घेतली पाहिजे.

कोणी सराफी व्यावसायिक ग्राहकाला खोटे बिल अथवा पावती देत असेल, तर ग्राहकाने तक्रार करण्याची गरज आहे. दागिन्यावर कोणत्या वर्षी हॉलमार्क झाले, दुकानदाराची माहिती, कोणत्या हॉलमार्क सेंटरमधून झाले, कॅरेटस आणि शुद्धता, तसेच त्रिकोणी बीआयएस मार्क अशा पाच प्रकारच्या उल्लेखाचा समावेश असतो.

कॅरेटस् म्हणजे शुद्धतेचे परिमाण असून सोने १४ कॅरेटस् म्हणजे ५८.५ टक्के, १८ कॅरेटस् म्हणजे ७५ टक्के, २२ कॅरेटस् ९१.६ टक्के आणि २४ कॅरेटस् म्हणजे ९९.९९ टक्के शुद्धता गृहित धरली जात असते.

सुवर्ण खरेदीसाठी ग्राहक जसा सुज्ञ असावा, तसाच सुवर्णकारदेखील प्रामाणिक ग्राहकहित साधणारा असावा अशी अपेक्षा असताना बीआयएस मानकाच्या अंमलबजावणीमुळे नोकरशाहीकडून गैरअर्थ काढला गेल्यास सोनाराची व्यावसायिक प्रतिष्ठा धुळीस मिळेल.

सॅम्पलच्या नावाखाली सोनाराची लुबाडणूक होईल किंवा ग्राहकाची फसवणूक करण्यासाठी सुवर्ण कारागीर, विक्रेते, व्यावसायिक आणि बीआयएस अधिकारी यांच्या साटेलोट्यातून मोठ्या प्रमाणात ग्राहकांना लुटले जाऊ शकणार आहे. यामुळे सुवर्णखरेदीसाठी ग्राहकांनी अनुत्सुकता दाखविल्यास या व्यवसायाला घरघर लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये हॉलमार्क सेंटरची सुविधा नसल्याने १ डिसेंबर २०२१पासून सुरू झालेल्या या हॉलमार्कच्या सक्तीचा अंमल सुरू झाल्यानंतर अतिरेक होऊ नये, अशी अपेक्षा रायगड जिल्ह्यातील सराफी व्यावसायिकांची संघटना करीत आहे, मात्र अलीकडेच सुवर्णकारांची संघटना संघटीत होत असल्याने अद्याप संघटनेमध्ये सुसूत्रता आली नसल्याने रायगड जिल्ह्यातील सोनार व्यावसायिकांमध्ये या हॉलमार्कच्या सक्तीच्या अमलाबाबत फारच भीतीचे वातावरण दिसून येत आहे.

## कर्जत तालुक्यात ग्रामपंचायतची रणधुमाळी

# १५ जागांसाठी पोटनिवडणुका

**२१ डिसेंबरला मतदान**

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील नऊ ग्रामपंचायतीच्या १५ जागांसाठी पोटनिवडणूक जाहीर करण्यात आली असून २१ डिसेंबर रोजी मतदान होणार असल्याची माहिती कर्जत तहसील कार्यालयातील निवडणूक विभागाचे रवी भारती यांनी दिली.

कर्जत तालुक्यातील हुमगाव, वेणगाव, माणगाव, बीड, नांदगाव, दहिवली आणि वदप या ग्रामपंचायतींमधील प्रत्येकी एक आणि भालीवडी ग्रामपंचायतीमधील ६ जागा, सावळे ग्रामपंचायतीमधील दोन अशा नऊ ग्रामपंचायतीच्या १५ जागांसाठी पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे.



**पोटनिवडणुकीचा कार्यक्रम**

- **नामनिर्देशनपत्रे दाखल करणे : ३० नोव्हेंबर ते ६ डिसेंबर २०२१**
- **नामनिर्देशनपत्र छाननी : ७ डिसेंबर रोजी ११ वाजल्यापासून**
- **नामनिर्देशनपत्र मागे घेण्याची अंतिम : ९ डिसेंबर रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत**
- **निवडणूक चिन्हवाटप : ९ डिसेंबर रोजी दुपारी ३ नंतर**
- **मतदान : २१ डिसेंबर रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३०**
- **मतमोजणी : २२ डिसेंबर २०२१**

# कर्जत सोलनपाडा परिसरात स्वच्छता मोहीम

## ▪ खैरमाता फिटनेस सेंटरसह स्थानिक तरुणांचे श्रमदान

**कर्जत : बातमीदार**

पर्यटनस्थळ बनलेल्या सोलनपाडा येथे पर्यटकांकडून प्लास्टिक आणि बाटल्या टाकण्यात आल्या होत्या. तो सुमारे ८० किलो कचरा येथील तरुणांसह खैरमाता फिटनेस सेंटरच्या सदस्यांनी गोळा केला आणि त्याची योग्यरीतीने विल्हेवाट लावली.



(छाया : संतोष पेरणे)

कर्जत तालुक्यातील सोलनपाडा धरण परिसरात बंदी असतानादेखील पावसाळ्यात पर्यटक आले होते. त्या हौशी पर्यटकांकडून सोलनपाडा परिसरात मोठ्या प्रमाणात प्लास्टिक आणि बाटल्या यांचा कचरा टाकण्यात आला होता. या धरणातील पाणी परिसरातील ग्रामस्थ पिण्यासाठी वापरतात. त्यामुळे धरणाच्या आजूबाजूला पडलेला कचरा गोळा करण्याचा निर्णय स्थानिक तरुणांनी घेतला होता.

या तरुणांनी खैरमाता फिटनेस सेंटरच्या माध्यमातून परिसरात फिरून सुमारे ८० किलो कचरा गोळा केला. व तो खड्डा खोदून नष्ट केला, अशी माहिती खैरमाता फिटनेस सेंटरचे निलेश पिंपरकर यांनी दिली.

# सार्वजनिक विहीर, रस्त्यासाठी वयोवृद्ध शेतकऱ्याचे शासन दरबारी खेटे

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील वावंढळ गावामधील सार्वजनिक विहीर आणि विहिरीकडे जाणाऱ्या रस्त्याची दुरवस्था झाली असून ग्रामस्थांचे हाल दूर व्हावे यासाठी शासनाने लक्ष द्यावे, म्हणून वयोवृद्ध शेतकरी सुरेश कदम शासन दरबारी उंबरठे झिजवत आहे.

**सार्वजनिक विहीर आणि रस्ता नादुरुस्त झाल्याने ग्रामस्थांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. सक्षम अधिकाऱ्यांनी पाहणी करून जिल्हा परिषद फंड, आमदार, तसेच खासदार फंडातून निधी मिळवण्यासाठी सहकार्य करावे.**

**–सुरेश धोंडोजीराव कदम, माजी सरपंच, वावंढळ, ता. खालापूर**

अतिवृष्टीमध्ये वावंढळ गावातील सार्वजनिक विहीर कोसळली होती. शिवाय विहिरीकडे जाणाऱ्या रस्त्याचीदेखील दुरवस्था झाली आहे. हा रस्ता वहिवाटीचा असून भिलवले गावातील विद्यार्थ्यांना वावंढळ गावातील शाळेत, तसेच शेतकऱ्यांना शेतावर जाण्यासाठी उपयुक्त आहे. ऑगस्ट महिन्यात ग्रामपंचायतीच्या मासिक सभेत रस्ता तसेच विहीर दुरुस्तीचा ठराव घेण्यात आला होता, मात्र ग्रामपंचायतीमध्ये पुरेसा निधी उपलब्ध नसल्याने विहिरीची दुरुस्ती रखडली आहे.

याबाबत प्रशासनाने लक्ष घालून विहीर दुरुस्तीचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी वयोवृद्ध शेतकरी सुरेश कदम यांनी रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, खालापूरचे वरिष्ठ गटविकास अधिकारी यांना लेखी निवेदने दिली आहेत. त्याचा पाठपुरावा करण्यासाठी कदम यांनी सोमवारी खालापूर पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांची भेटदेखील घेतली.



# कोरोना नियमांचे पालन करावे

## खोपोली पालिका प्रशासनाचे आवाहन

**खोपोली : प्रतिनिधी**

अमायक्रॉनची संभाव्य लाट रोखण्यासाठी नागरिकांनी प्रतिबंधात्मक लसीचे डोस घ्यावेत, सोशल डिस्टन्सिंग पाळावे आणि मास्कचा वापर नियमित करावा, असे आवाहन खपोली नगरपालिकेच्या आरोग्य खात्याकडून करण्यात येत आहे.

जगभरात ओमायक्रॉनचा प्रादूर्भाव वाढत असल्याने राज्य शासनाच्या सूचनेनुसार खबरदारीचा उपाय म्हणून खोपोली नगर परिषदेच्या आरोग्य विभागाने शहरातील सार्वजनिक ठिकाणी विनामास्क आढळणाऱ्या व सोशल डिस्टन्सिंगचे पालन न करणाऱ्या नागरिकांवर दंडात्मक कारवाई करण्यासाठी पथक नेमले आहे. या पथकामार्फत शहरातील मॉल्स, हॉटेल, चित्रपटगृह यांना भेटी देऊन शासनाच्या नियमाचे कडक पालन करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. आवाहनाला दाद न देणाऱ्यांकडून दंड वसूल करण्यात येत आहे.



(छाया : विनायक माडपे)



# नेरळ ग्रामपंचायतीच्या उपसरपंचांचा राजीनामा

**कर्जत : बातमीदार**

नेरळ ग्रामपंचायतीच्या मंगळवारी (दि. ३०) झालेल्या मासिक सभेत शंकर घोडविंदे यांनी आपल्या उपसरपंच पदाचा राजीनामा दिला.

नेरळ ग्रामपंचायतीमध्ये सध्या शिवसेना, भाजप, शेकाप, आरपीआय यांच्या आघाडीची सत्ता आहे, मात्र सार्वत्रिक निवडणुकीत अपक्ष म्हणून निवडून आलेले शेकापचे कार्यकर्ते शंकर किसन घोडविंदे यांनी उपसरपंच पदाच्या निवडणुकीत शिवसेना उमेदवाराचा पराभव केला होता. डिसेंबर २०१९ पासून उपसरपंच पदावर काम करणारे घोडविंदे यांनी मंगळवारी मासिक सभेत उपसरपंच पदाचा राजीनामा सरपंच उषा पारधी यांच्याकडे दिला.

आता विशेष सभेत घोडविंदे यांच्या राजीनामापत्रावरील सहीची पडताळणी केली जाईल. त्यानंतर उपसरपंच पद रिक्त होणार आहे. उपसरपंच पदाची निवडणूक डिसेंबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात होणे अपेक्षित आहे.

## पेणमध्ये अभियांत्रिकी विद्यार्थ्यांचा मेळावा

**पेण :** अभियांत्रिकीच्या १९८० ते ८३ बॅचच्या विद्यार्थ्यांचा मेळावा नुकताच पेण सापोली येथे घेण्यात आला. चंद्रशेखर शिळे यांनी सूर्यकांत विरकर, प्रशांत पाथरे, बाळाजी शिर्के, संजय हरकर यांच्या सहकार्याने या मेळाव्याचे आयोजन केले होते.

गुरुवर्य वसंत रामचंद्र सर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या मेळाव्यात अनेक मित्रांनी सपत्नीक आपले मनोगत व्यक्त करून जुन्या आठवणींना उजाळा दिला. या वेळी वसंत रामचंद्र सर यांचा सन्मान चिन्ह, शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. सुदिन सावंत यांनी प्रास्ताविक, तर पेण महाविद्यालयाचे प्रा. मोरे यांनी सूत्रसंचालन केले.

# रायगड जिल्ह्यात अवकाळी पावसाची रिपरिप

(छाया : संजय करडे)



## मुरूड बाजारपेठेत सामसूम

**मुरूड : प्रतिनिधी**

तालुक्यात बुधवारी सकाळी सहा वाजल्यापासून रिमझिम पावसाची सुरुवात झाली. त्यामुळे वातावरणात गारवा आला आहे. काल दिवसभर येथे ढगाळ वातावरण होते. आज पाऊस सुरू झाल्याने जनजीवन विस्कळीत झाले. बाजारात होणारी गर्दी ओसरली होती. ढगाळ वातवरण व पाऊस सुरू झाल्याने बोटी किनाऱ्यावर लावण्यात आल्या आहेत.

आजपासून शहरी भागात पहिली ते सातवी, तर ग्रामीण भागात पहिली ते चौथीचे वर्ग सुरू करण्यात आले. खूप दिवसाच्या अंतराने शाळा सुरू झाल्याने मुलांमध्ये उत्साह दिसून आला. पावसामुळे लहान मुलांनी छत्री घेऊन शाळेत हजेरी लावली.



## रोह्यात नागरिकांची उडाली तारांबळ

**रोहे : प्रतिनिधी**

तालुक्यात बुधवारी सकाळपासून पावसाने हजेरी लावल्याने नागरिकांची तारांबळ उडाली. दिवसभर पावसाची रिपरिप सुरू राहिल्याने सर्वत्र पाणीच पाणी झाले होते.

रोहे शहरासह तालुक्यातील मेढा, पिंगळसई, सानेगाव, यशवंतखार, चणेरा, कोलाड, घोसाळे भागात पावसाने बुधवारी सकाळपासूनच हजेरी लावली. त्यामुळे हवेत गारवा आला होता. शाळा, महाविद्यालये सुरू झाल्याने विद्यार्थ्यांनी पावसाचा आनंद लुटला. नागरिकांनी छत्री, रेनकोट पुन्हा बाहेर काढले, मात्र बाजारपेठेत शुकशुकाट होता. दिवसभर काळोख दाटला होता.

भात कापणी केल्यानंतर शेतकऱ्यांनी वाल व अन्य कडधान्याची लागवड केली होती, मात्र आज झालेल्या अवेळी पावसामुळे त्यांचे नुकसान होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकरी धास्तावला आहे. पाऊस असाच राहिल्यास कडधान्य पिकांचे नुकसान होण्याची शक्यता आहे.



(छाया : महादेव सरसंबे)

(छाया : धम्मशील सावंत)



## सुधागडात रब्बी पिकांचे मोठे नुकसान

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यात थंडीच्या दिवसात बुधवारी पावसाने हजेरी लावली. अचानक आलेल्या या पावसाने अनेकांची तारांबळ उडवली. थंडीच्या महिन्यात आलेल्या पावसामुळे अनेकांवर स्वेटरऐवजी छत्री घेऊन बाहेर पडण्याची वेळ आली.

गेल्या दोन दिवसांपासून सुधागड तालुक्यात काही ठिकाणी ढगाळ वातावरण पाहायला मिळत होते. त्यानंतर बुधवार सकाळपासून पाली, परळी, जांभूळपाडा, नांदगाव, शिहू, बेणसे, चोळे गांधे, झोतिरपाडा, कुहिरे, कडसुरे, आंबेघर, वणी यासह काही ठिकाणी पावसाच्या सरी कोसळल्या. यामुळे हवेत काहीसा गारवा निर्माण झाला, मात्र रब्बी पिकांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे सुधागड तालुक्यातील शेतकरी हतबल झाले आहेत.

## 'अवकाळी'मुळे कडधान्य पिके धोक्यात

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील धाटाव परिसरात बुधवारी पहाटे ५ वाजल्यापासून पावसाच्या हलक्या सरी कोसळल्या.

या अवकाळी पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले. बहुसंख्य नागरिकांनी घरातच बसणे पसंत केल्याने दुकानांमध्ये शुकशुकाट होता. त्यामुळे व्यापाऱ्यांमध्ये नाराजी पसरली आहे.

धाटाव परिसरातील शेतकऱ्यांनी आपल्या शेतात कडधान्य पिके पेरली होती. त्यांना चांगला फुटवाही आला आहे. त्यांना पोषक असलेले दव व धुके पडले तेव्हा शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण होते.

बुधवारी सकाळपासून पडलेल्या पावसाचे पाणी शेतात तुंबल्याने कडधान्य, तसेच भाजीपाला पिके धोक्यात आली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

> **या हंगामात तीन एकरमध्ये शिरला, कारली, भेंडी, मिरची, टोमॅटो, वांगी, भोपळा, दुधी, कलिंगड, काकडी व पालेभाजीची लागवड केली आहे. या अवकाळी पावसामुळे भाज्यांवर किडीचा प्रादूर्भाव दिसून येत आहे. त्यामुळे पीक कमी येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.**
> **–ज्ञानदेव नारायण सुटे, शेतकरी, बोरघर, ता. रोहा**



## पेणमध्ये आंब्याचा मोहोर गळून नुकसान



(प्रातिनिधीक छायाचित्र)

**पेण : प्रतिनिधी**

गेल्या चार दिवसांपासून पेण तालुक्यात ढगाळ वातावरण होते. बुधवारी दिवसभर अवकाळी पावसाच्या सरी कोसळत होत्या. ढगाळ वातावरण आणि रिमझिम पावसामुळे पेण तालुक्यातील आंबा पीक धोक्यात आले आहे.

आंब्याला आता कुठे मोहर यायला सुरुवात झाली होती, मात्र ढगाळ वातावरण व अवकाळी पाऊस यामुळे पेण तालुक्यात हापूस, केशरी, राजापुरी आदी प्रकारच्या आंब्यांचा मोहर गळून पडू लागला आहे.

> **तालुक्यात चार दिवसांपासून ढगाळ वातावरण निर्माण झाले होते. बुधवारी अवकाळी पावसाने हजेरी लावली. त्यामुळे आंबा बागायतदारांचे नुकसान झाले आहे.**
> **–जितेश मांढरे, आंबा उत्पादक शेतकरी, पेण**

> **पेण तालुक्यात पाऊस आणि ढगाळ वातावरणामुळे नवीन पालवी फुटलेल्या आंब्याच्या झाडांवर तुडतुडे पडण्याची शक्यता आहे. शेतकऱ्यांनी उघडीप असताना डेल्टामेथ्रीन २८ टक्के प्रवाही मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून झाडावर आणि खोडावर फवारणी करावी.**
> **–अनिल रोकडे, तालुका कृषी अधिकारी, पेण**

# कर्जत तालुक्यात आजपासून ड्रोन सर्वेक्षण

## ■ सर्व गावांतील गावठाण हद्द होणार निश्चित

**कर्जत : बातमीदार**

गावठाण क्षेत्रामधील घरे, रस्ते, नाले यांच्या सीमा निश्चित करण्यासाठी सर्व्हे ऑफ इंडियाकडून कर्जत तालुक्यातील सर्व ३३६ गावांचे ड्रोन सर्वेक्षण केले जाणार आहे. त्याची सुरुवात गुरुवार (दि. २) पासून होणार असून ड्रोन सर्वेक्षणानंतर घरमालकांना आपल्या मिळकतीचे प्रॉपर्टीकार्ड मिळणार आहे आणि यानिमित्ताने शासनाची यंत्रणा अद्ययावत होण्यास मदत होणार आहे.

राज्यातील प्रत्येक गावाच्या गावठाण क्षेत्रात असलेल्या मिळकतींचे संरक्षण करण्यासाठी राज्य सरकारकडून ड्रोन सर्वेक्षण प्रकल्प राबविण्यात येत आहे. ग्रामविकास, महसूल आणि भूमिअभिलेख विभाग यांच्या माध्यमातून सर्व्हे ऑफ इंडियाकडून हे सर्वेक्षण केले जाणार आहे.

कर्जत शहर, गुंडगे, नेरळ, कळंब, भिसेगाव आणि माथेरान या गावांतील मिळकतींचे प्रॉपर्टीकार्ड तयार आहेत, मात्र तालुक्यातील अन्य महसुली गावांच्या गावठाणामधील मिळकतींचे सर्वेक्षण आजपर्यंत झाले नव्हते. मनुष्यबळ लावून एका वेळी तालुक्यातील ३३६ गावांमधील गावठाण मिळकतींचे सर्वेक्षण करणे सोपे नाही, म्हणून सर्व्हे ऑफ इंडियाकडून ड्रोन सर्वेक्षण करण्याचा प्रकल्प कर्जत तालुक्यात राबविण्यात येत आहे.



### असे होईल सर्वेक्षण

ग्रामपंचायत आणि तलाठी स्तरावर गावठाण क्षेत्रातील घरांच्या सीमा निश्चित करण्यासाठी सर्व घरांवर घरक्रमांक टाकतील, त्याच वेळी चुन्याच्या सहाय्याने हद्द निश्चित करण्यासाठी पट्टे मारण्यात येतील. ड्रोनच्या माध्यमातून गावातील घरे, रस्ते, नाले यांच्या सीमा निश्चित करण्याचे काम हे सर्वेक्षण करणार आहे. त्यातून मूळ गावठाण सीमादेखील निश्चित होणार असून, त्याचा फायदा बिनशेती जागेच्या सीमा निश्चित करण्यासाठी होऊ शकतो. जीआयएस प्रणालीवर आधारित गावठाण निश्चित होणार असल्याने शासनाकडून नोंदवही अद्ययावत होणार आहे. संगणकीय प्रणालीवर भविष्यात नकाशे निश्चित करण्यासाठी ड्रोनने केले जाणारे गावठाण सर्वेक्षण फायद्याचे ठरू शकते, अशी माहिती कर्जतचे तहसीलदार विक्रम देशमुख आणि भूमिअभिलेखचे उपअधीक्षक इंद्रसेन लांडे यांनी दिली. या कामी ग्रामसेवक, तलाठी, मंडळ अधिकारी, विस्तार अधिकारी, नायब तहसीलदार, गटविकास अधिकारी, तहसीलदार यांच्यासह भूमिअभिलेखचे सर्व्हेअरदेखील ड्रोन सर्वेक्षणात सहभागी असणार आहेत.

### ड्रोन सर्वेक्षणाचे फायदे

या ड्रोन सर्वेक्षणामुळे तालुक्यातील सर्व ३३६ महसुली गावातील शासनाच्या मिळकतीचे संरक्षण होणार आहे. त्या त्या गावातील घरे, रस्ते, शासनाच्या मोकळ्या जागा यांच्या सीमा निश्चित होणार आहेत. घर मालकांच्या मिळकतीचे प्रॉपर्टीकार्ड तयार होऊन ते अद्ययावत होणार आहेत. स्थानिकांच्या नागरी हक्कांचे संरक्षण होऊ शकते आणि जागेवरून निर्माण होणारे वाद कमी होण्यास मदत होईल. प्रत्येक मिळकतीचे प्रॉपर्टीकार्ड तयार झाल्यास गावाची आर्थिक पत उंचावण्यास मदत होईल. ड्रोन सर्वेक्षणानंतर भूमिअभिलेख विभाग अद्ययावत होऊन त्याचा फायदा प्रशासकीय पातळीवर सर्व नकाशे सहज उपलब्ध होतील. स्थानिकांच्या उत्पन्नाचे स्त्रोत वाढतील आणि प्रॉपर्टीकार्डमुळे वाद कमी होण्यास मदत होईल.

ड्रोनने एकदा आकाशात झेप घेतली की, एकावेळी पाच गावांचे सर्वेक्षण होणार आहे. गुरुवारी कर्जत तालुक्यातील शिरसे ग्रामपंचायत हद्दीमधील तमनाथपासून या ड्रोन सर्वेक्षणाला सुरुवात होणार आहे.

# पर्यटक गारठले, रेवदंडा समुद्रकिनारा पडला ओस

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अवकाळी पावसाने बुधवारी रेवदंड्यासह परिसरातील जनजीवन ठप्प झाले असून पर्यटकांविना रेवदंडा समुद्रकिनारा ओस पडला.

अलिबाग तालुक्यातील रेवदंडा परिसरात बुधवारी सकाळपासून पावसाची रिपरिप सुरू झाली होती, दुपारी पावसाचा जोर वाढल्याने वातावरणात काहीसा गारवा जाणवत होता. अवकाळी पावसाच्या हजेरीने अनेकांनी घरात राहणे पसंत केले. पर्यटकांविना नागाव, आक्षी, रेवदंडा व काशिद समुदकिनारेसुद्धा बुधवारी ओस पडले होते. नित्याचा रहदारीचा रस्ता सुनासुना होता. रेवदंडा, नागाव बाजारपेठेतील दुकाने, हॉटेल्स, लॉजिंग व्यावसायिकांनासुद्धा या अवकाळी पावसाचा फटका बसला.

भाजीमार्केट, मच्छीमार्केटमध्ये विक्रेते ग्राहकांची वाट पाहात होते.

## शिक्षकाकडून अल्पवयीन विद्यार्थिनीचा विनयभंग

**पाली : प्रतिनिधी**

गुरू–शिष्याच्या पवित्र नात्याला काळिमा फासण्याचा धक्कादायक व संतापजनक प्रकार पालीतील ग. बा. वडेर हायस्कूलमध्ये सोमवारी (दि. २९) घडला. परीक्षा सुरू असताना सातवीत शिकणाऱ्या अल्पवयीन मुलीचा शाळेतील ज्येष्ठ शिक्षकाने विनयभंग केला. गुलाब पाटील असे या शिक्षकाचे नाव असून, त्याच्यावर मंगळवारी (दि. ३०) सायंकाळी पाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ग. बा. वडेर हायस्कूलमध्ये सोमवारी गणित विषयाचा पेपर चालू असताना गुलाब पाटील या शिक्षकाने सातवीत शिकणाऱ्या अल्पवयीन मुलीचा विनयभंग केला. या आधीदेखील त्याने असा प्रकार केला असल्याने मुलीच्या नातेवाईकांनी त्याच्या विरोधात तक्रार दाखल केली.

त्यानुसार पाली पोलीस ठाण्यात भादंवि कलम ३५४ (अ)(१)सह लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम २०१२चे कलम ८, ९ (एफ)(एम), १० नुसार शिक्षक गुलाब पाटील याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास सहाय्यक निरीक्षक तृप्ती बोराटे करीत आहेत.

# नागरिकांनी सतर्क राहावे!

**पेणच्या नगराध्यक्ष प्रीतम पाटील यांचे आवाहन**

**पेण : प्रतिनिधी**

नव्या ओमायक्रॉन कोरोना विषाणूचे संक्रमण रोखण्यासाठी नागरिकांनी सतर्क राहून नियमांचे पालन काटेकोरपणे करावे, असे आवाहन पेणच्या नगराध्यक्ष प्रीतम पाटील यांनी नागरिकांना केले आहे.

ओमायक्रॉन संक्रमणाच्या पार्श्वभूमीवर स्थानिक प्रशासन म्हणून आम्ही पूर्णतः सतर्कता बाळगत असून यासाठी नागरिकांनीही काळजी घेणे गरजेचे आहे. स्वतःची सुरक्षा स्वतःच्या हातात असून, त्यामुळे या विषाणूचा प्रसार रोखण्यास आपण यशस्वी ठरू शकतो, असा विश्वास नगराध्यक्ष पाटील यांनी व्यक्त केला.

ओमायक्रॉनला रोखण्यासाठी पेण नगर परिषदेच्या वतीने विविध उपाययोजना करण्यात येत असून नागरिकांना मास्क लावणे बंधनकारक असल्याच्या सूचना देण्यात येत आहेत. लग्न समारंभ, सार्वजनिक कार्यक्रम अशा ठिकाणी ५० टक्के क्षमतेपेक्षा जास्त उपस्थिती असू नये अशा सूचना संबंधित हॉल मालकांना देण्यात आल्या आहेत. नगर परिषद प्रशासनाच्या वतीने लस देण्याचे प्रमाण वाढविण्यात आले आहे. ज्यांनी अजूनही लस घेतली नाही अशा नागरिकांची माहिती गोळा करण्यात येत असून त्यांना लस घेण्याच्या सूचना देण्यात येणार आहेत. पेण शहरातील इनडोअर गेम हॉल येथे लसीकरण केंद्र सुरू असून नागरिकांनी स्वतः पुढाकार घेऊन लसीकरण मोहिमेस सहकार्य करावे, असे नगराध्यक्ष प्रीतम पाटील यांनी सांगितले.



## पोलादपुरात दुचाकीच्या धडकेत मुलगा जखमी

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील कापडे बुद्रुक येथे भरधाव दुचाकीची धडक बसून एक मुलगा जखमी झाला. दुचाकी चालकावर विनापरवाना वाहन चालविणाऱ्या दुचाकी चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलादपूर तालुक्यातील कापडे बुद्रुक येथील कंक कार वॉशिंग ॲण्ड सर्व्हिस सेंटरसमोर कृष्णा दादा गोळे (वय २६, रा. मुगांव, ता. वाई, जि. सातारा) या दुचाकी (एमएच ११, सीबी ९२५१) चालकाने आर्यन सुनील कंक (वय १२, रा. रानवडी, ता. पोलादपूर) याला धडक दिली. या अपघातात आर्यन कंक गंभीर जखमी झाला. त्याला पोलादपूर ग्रामीण रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले आहे. या अपघाताची नोंद पोलादपूर पोलीस ठाण्यात करण्यात आली असून, अधिक तपास सुरू आहे.





**उरण नगरपरिषद, उरण**

**निविदा सूचना**

जा.क्र. उनप/आरोग्य/२८४३/२०२१–२२
उरण नगरपरिषद, उरण, जि. रायगड.
दिनांक : ०१/१२/२०२१

उरण नगरपरिषदेच्या हद्दीतील खालील कामाकरिता अनुभवी ठेकेदाराकडून दोन सिलबंद निविदा दरपत्रके मागविणेत येत आहेत.

| अ.क्र. | तपशील | इसारा रक्कम | निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|
| १. | उरण नगरपरिषदेच्या आरोग्य विभागासाठी जे.सी.बी., डंपर, मनुष्यबळ सेवा पुरविणेकामी वार्षिक ठेकेदार नियुक्त करणे. | ५०००/– | १०००/– |

**अटी/शर्ती :–**

१. कोऱ्या निविदा फॉर्मचे नमुने निविदा शुल्क (ना परतावा) नगरपरिषदेच्या लेखा विभागात कार्यालयीन सुट्टीचे दिवस सोडून इतर कार्यालयीन कामकाजाच्या वेळेस दिनांक ०२/१२/२०२१ ते दिनांक १४/१२/२०२१ रोजीपर्यंत रोखीने भरल्यास आरोग्य विभागात सकाळी १०.०० ते सायं. ५.०० वाजेपर्यंत उपलब्ध होतील.
२. इसारा अनामत दिनांक ०२/१२/२०२१ ते दिनांक १४/१२/२०२१ रोजीचे सायं. ४.०० वाजेपर्यंत लेखा विभागात स्विकारली जाईल.
३. सिलबंद निविदा/दरपत्रके दोनस लखोटे पद्धतीने कार्यालयीन सुट्टीचे दिवस सोडून इतर कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत आवक/जावक विभागात स्विकारण्याची अंतिम दिनांक १५/१२/२०२१ रोजीचे दुपारी ४.०० वाजेपर्यंत असेल. तसेच मुदतीनंतर आलेल्या निविदा/दरपत्रके स्विकारण्यात येणार नाहीत किंवा त्याबाबत कोणतीही कारणे दिली जाणार नाहीत.
४. निविदा सादर करतेवेळी लखोटा क्र. १ मध्ये इसारा अनामत रोखीने भरलेली मूळ पावती, अनुभवाचे दाखले/नोंदणी प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहे. लखोटा क्र. २ मध्ये उरण नगरपरिषदेने विहित नमुन्यात तयार केलेल्या निविदा फॉर्ममध्ये खाडाखोड न केलेले भरलेले दरपत्रक सादर करणेचे आहे.
५. सिलबंद निविदा/दरपत्रके विहित कालावधीत समक्ष सादर करावयाची आहेत. त्या पोष्टाने पाठविल्यास उरण नगरपरिषद त्यांचा स्वीकार करणार नाही. किंवा त्याबाबत कोणतेही कारण देण्यात येणार नाही.
६. विहित मुदतीत प्राप्त झालेल्या वैध निविदा शक्यतो निविदा स्विकृतीच्या अंतिम दिनी सायं. ५.०० वाजता किंवा शक्य न झाल्यास लगतच्या दुसऱ्या दिवशी पुरवठादार किंवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधी यांचे समक्ष मे. मुख्याधिकारी, उरण नगरपरिषद यांच्या दालनात उघडणेत येईल.
७. कोणतेही निविदा/दरपत्रक पूर्णपणे किंवा अंशत: स्विकारणे किंवा आलेल्या सर्व निविदा/दरपत्रके नाकारण्याचा सर्व अधिकार नगरपरिषदेचे असतील. तसेच कोणतेही कारण न देता निविदा/दरपत्रके रद्द करण्याचा अधिकार नगरपरिषदेस असेल.

सही/–
(संतोष माळी)
मुख्याधिकारी, उरण नगरपरिषद, उरण

# संघमालकांकडून बडे खेळाडू करारमुक्त

## आता लिलावातील बोलीवर ठरणार आगामी वाटचाल




**मुंबई : प्रतिनिधी**

इंडियन प्रीमियर लीगच्या (आयपीएल) पुढील म्हणजेच २०२२च्या पर्वाआधी अनेक संघांनी आपल्या महत्त्वाच्या खेळाडूंनाही करारमुक्त केले आहे. करारमुक्त केलेल्या खेळाडूंमध्ये अनेक मोठ्या खेळाडूंची नावे आहे. या खेळाडूंना जानेवारीत होणाऱ्या भव्य लिलावप्रक्रियेत संघांना पुन्हा खरेदी करता येऊ शकेल.

के. एल. राहुलला पंजाब किंग्सच्या संघाने रिटेन केलेले नाही, कारण त्याने लिलावात जाण्याचा निर्णय घेतला आहे. राहुल हा भारतीय संघातील महत्त्वाचा खेळाडू असून सलामीवीर म्हणून सध्या उत्तम कामगिरी करतोय. राहुल आयपीएलमध्ये ९४ सामने खेळला आहे. तो यष्टीरक्षकही आहे. राहुलने ९४ सामन्यांमध्ये एकूण ३२७३ धावा केल्यात, ज्यात दोन शतके आणि २७ अर्धशतकांचा समावेश आहे.

आयपीएलच्या इतिहासामध्ये सर्वाधिक धावा करणाऱ्या खेळाडूंच्या यादीत दुसऱ्या स्थानी असणाऱ्या शिखर धवनलाही दिल्ली कॅपिटल्सने करारमुक्त केले आहे. धवनने या टी-२० स्पर्धेत आतापर्यंत ५,७८४ धावा केल्या आहेत.

भारतीय संघात नुकतेच पदार्पण करणाऱ्या श्रेयस अय्यरलाही दिल्लीच्या संघाने रिटेन केलेले नाही. श्रेयसने यापूर्वी दिल्ली संघाचे नेतृत्वही केले आहे. त्याच्याच नेतृत्वाखाली दिल्ली संघ पहिल्यांदा अंतिम सामन्यात पोहचला होता. अय्यरने ८७ सामन्यांमध्ये २,३७५ धावा केल्या असून त्यात १६ अर्धशतकांचा समावेश आहे.

ऑस्ट्रेलियाचा स्टार क्रिकेटपटू डेव्हिड वॉर्नरलाही त्यांच्या सनरायझर्स हैदराबाद संघाने रिटेन केलेले नाही. वॉर्नरने आयपीएलमध्ये १५०हून अधिक सामने खेळले असून त्याच्या नावावर ५,४४९ धावा आहेत.

अनुभवी फिरकीपटू रविचंद्रन अश्विनलाही दिल्लीच्या संघाने रिटेन केलेले नाही. अश्विनने २०२१च्या आयपीएलमधील १३ सामन्यांमध्ये सात गडी बाद केले होते.

अष्टपैलू हार्दिक पांड्या आणि यष्टीरक्षक इशान किशन यांना मुंबई संघाने मुक्त केले. मागील काही काळात हार्दिकला कामगिरी सातत्य न राखल्याने संघाबाहेर करण्यात आले. अफगाणिस्तानचा फिरकीपटू राशिद खानला सनरायझर्स हैदराबादने रिटेन केलेले नाही.

## संघातील विशिष्ट खेळाडूंवर मालकांचा विश्वास कायम

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

इंडियन प्रीमियर लीग ट्वेन्टी-२० क्रिकेटच्या १५व्या हंगामापूर्वी काही संघांनी खेळाडूंना करारमुक्त करण्याचा निर्णय संघांनी घेतला, तर काही संघांनी आपल्या जुन्या खेळाडूंवर विश्वास दाखविला आहे.

**कायम राखण्यात आलेले खेळाडू**

मुंबई इंडियन्स : रोहित शर्मा (१६ कोटी) जसप्रीत बुमरा (१२ कोटी) सूर्यकुमार यादव (८ कोटी) किरॉन पोलार्ड (६ कोटी).

दिल्ली कॅपिटल्स : ऋषभ पंत (१६ कोटी), अक्षर पटेल (९ कोटी), पृथ्वी शॉ (७.५ कोटी), आनरिख नॉर्किए (६.५ कोटी).

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू : विराट कोहली (१५ कोटी), ग्लेन मॅक्सवेल (११ कोटी), मोहम्मद सिराज (७ कोटी).

राजस्थान रॉयल्स : संजू सॅमसन (१४ कोटी), जोस बटलर (१० कोटी), यशस्वी जैस्वाल (४ कोटी).

चेन्नई सुपर किंग्ज : रवींद्र जडेजा (१६ कोटी). महेंद्रसिंह धोनी (१२ कोटी). मोईन अली (८ कोटी), ऋतुराज गायकवाड (६ कोटी).

कोलकाता नाइट रायडर्स : आंद्रे रसेल (१२ कोटी), वेंकटेश अय्यर व वरुण चक्रवर्ती (८ कोटी) सुनील नरिन (६ कोटी).

सनरायजर्स हैदराबाद : केन विल्यम्सन (१४ कोटी), उमरान मलिक व अब्दुल समद (४ कोटी).

पंजाब किंग्ज : मयांक अगरवाल (१२ कोटी), अर्शदीप सिंग (४ कोटी).

### राष्ट्रीय किशोर-किशोरी खो-खो स्पर्धा

## महाराष्ट्राला सहाव्यांदा दुहेरी मुकूट



**उना (हिमाचल प्रदेश) : वृत्तसंस्था**

३१व्या राष्ट्रीय किशोर-किशोरी अजिंक्यपद खो-खो स्पर्धेत महाराष्ट्राने इतिहास रचला आहे. हिमाचल प्रदेशमधील उना येथील इंदिरा गांधी स्टेडियमवर झालेल्या अंतिम फेरीत महाराष्ट्रच्या किशोरांनी कर्नाटकवर, तर किशोरींनी पंजाबवर विजय मिळवत दुहेरी मुकुटासह अजिंक्यपद मिळवले. या स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू भरत पुरस्कार आशिष गौतमला, आणि ईला पुरस्कार सानिका चाफेला देऊन गौरविण्यात आले.

अंतिम सामन्यात महाराष्ट्राच्या किशोर संघाने कर्नाटकवर १०-०६ असा एक डाव चार गुणांनी विजय मिळवत कर्नाटकचा धुव्वा उडवला. महाराष्ट्राच्या आशिष गौतम (२.१०, ३.१० मि. संरक्षण व १ गडी), जितेंद्र वसावे (२, १.३० मि. संरक्षण), हाराद्या वसावे (१.२०, २ मि. संरक्षण व २ गडी), अथर्व पाटील (नाबाद १.३० मि. संरक्षण) व मोहन चव्हाण (३ गडी) व कर्णधार सोत्या वळवी (२ गडी) व राज जाधव (२ गडी) यांनी विजयात चमकदार खेळी केली, तर कर्नाटकच्या प्रिथम (१.१० मि. संरक्षण व २ गडी), पी. गुरूबत (१ मि. संरक्षण व १ गडी) व एल. व्ही. समर्थ (१.१० मि. संरक्षण) यांनी केलेली खेळी त्यांना मोठ्या पराभवापासून वाचवू शकली नाही.

महाराष्ट्राच्या किशोरींनी अंतिम सामन्यात पंजाबला ११-०३ असा एक डाव आठ गुणांनी धूळ चारली. महाराष्ट्राच्या कर्णधार सानिका चाफे (५.५०, नाबाद ३.१० मि. संरक्षण व ४ बळी), सुषमा चौधरी (नाबाद १.१०, २.५० मि. संरक्षण व १ बळी), धनश्री कंक (१ मि. संरक्षण) व अंकिता देवकर (४ बळी), धनश्री करे (१ बळी), समृद्धी पाटील (१ बळी) यांनी महाराष्ट्राच्या विजयात महत्त्वपूर्ण कामगिरी केली, तर पंजाबच्या स्नेहप्रीत कौर (१:३० मि. संरक्षण व १ बळी) व संजना देवी (१.३० मि. संरक्षण) करीत एकाकी लढत दिली.

किशोर गटाने आतापर्यंत १० वेळा, तर किशोरी गटाने १५ वेळा विजेतपद पटकाविले आहेत. किशोर गटाने यंदा सलग सहा वेळा विजेतपद कायम राखले, तर या वेळी महाराष्ट्राला मिळवलेले हे सहावे दुहेरी अजिंक्यपद आहे.

## आरोग्य प्रहर

### ड्रायव्हिंग आणि डोळ्यांवर येणारा ताण



डोळ्यांवर येणाऱ्या वाढत्या ताणामुळे गाडी चालवताना, विशेषतः रात्रीच्या वेळी गाडी चालवताना अडचण येऊ शकते. अधू दृष्टीमुळे जीवाला धोका संभवू शकतो व दृष्टिदोष असणाऱ्या व्यक्तीसाठी गाडी चालवणे हे धोकादायक व काळजीचा विषय असू शकते. जवळ येणाऱ्या वस्तू, हेडलाइट्सचा उजेड किंवा मावळत्या सूर्याच्या किरणांची तिरीप यांच्यावर लक्ष केंद्रित करण्यासाठी आपले डोळे सतत फिरत असतात; तेव्हा वर दिलेली लक्षणे जाणवल्यास तो धोक्याचा इशारा समजून त्याकडे त्वरित लक्ष द्यावे. गाडी चालविण्याशी संबंधित धोके टाळण्यासाठी काही प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे हे या बाबतीतला कोणताही धोका टाळण्याच्या दिशेने उचललेले पहिले पाऊल असेल.

एअर कंडिशनर्समुळे हवेतील आर्द्रता कमी होते व त्यामुळे डोळ्यांतील ओलावाही सुकून गेल्याने डोळे कोरडे होतात. एसीचा झोत थेट तुमच्या चेहऱ्यावर येत असेल, तर त्यामुळे डोळ्यांना सतत स्निग्धता पुरविणाऱ्या लिपिड लेअरला हानी पोहचते. गाडीतील एअर कंडिशनिंग कमी ठेवल्याने व त्याचा झोत चेहऱ्यापासून दूर ठेवल्याने ही समस्या टाळता येईल.

प्रखर सूर्यप्रकाश, समोरून येणाऱ्या गाड्यांच्या हेडलाइट्सचा थेट प्रकाश, एकाच गोष्टीकडे खूप वेळ पाहत राहणे इत्यादी गोष्टींमुळे नजर धुसर होण्याची समस्या उद्‍भवू शकते. संरक्षक किंवा अँटी ग्लेअर आय वेअर या समस्येपासून संरक्षण पुरवू शकतात. पुरेशा प्रमाणात पाणी किंवा इतर द्रवपदार्थ प्यायल्याचा डोळ्यांना फायदा होतोच, पण त्याचबरोबर गाडी चालविताना लागणारी एकाग्रताही वाढते. थोडी विश्रांती घ्या, गाडी चालविण्यासाठी योग्य वेळ निवडा. दर दोन तासांनी १५ मिनिटांची विश्रांती घ्या, तसेच आधीच थकलेले असताना लांबच्या प्रवासासाठी निघू नका.

डोळ्यांना झालेला त्रास कमी करण्यासाठी आयड्रॉप्सची मदत होऊ शकते. एखाद्या वस्तूकडे खूप वेळासाठी पाहत राहिल्यामुळे पापण्यांची उघडझाप लक्षणीय प्रमाणात कमी होऊ शकते. ही उघडझाप जितकी कमी तितके तुमचे डोळे कोरडे होण्याची, त्यांना त्रास होण्याची शक्यता जास्त. डोळ्यांना ताजेतवाने करणारे व डोळ्यांची खाज कमी करण्यासाठी आय ड्रॉप्स वापरणे हा उपाय आहे. अशा प्रकारे डोळ्यांचे स्वास्थ्य टिकवणे आवश्यक आहे.

**-डॉ. पलनीसामी सुरेश, नेत्रविकारतज्ज्ञ सल्लागार, फोर्टिस हॉस्पिटल, मुलुंड**

# लिओनेल मेस्सी बॅलन डी'ओरचा मानकरी

### चेल्सी क्लब सर्वोत्तम

**पॅरिस : वृत्तसंस्था**

अर्जेंटिना आणि पॅरिस सेंट-जर्मेनचा फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी विक्रमी सातव्यांदा बॅलन डी'ओर पुरस्काराचा मानकरी ठरला. त्याने बायर्न म्युनिकचा रॉबर्ट लेवांडोवस्की आणि चेल्सीचा जॉर्जिन्हो यांच्यावर मात करीत या मानाच्या पुरस्कारावर आपले नाव कोरले. वर्षांतील सर्वोत्तम क्लबचा पुरस्कार चॅम्पियन्स लीग विजेत्या चेल्सीने पटकावला.

फ्रान्स फुटबॉल मासिकाच्या वतीने १९५६ सालापासून वर्षांतील सर्वोत्तम फुटबॉलपटूला बॅलन डी'ओर पुरस्कार प्रदान करण्यात येत आहे. ३४ वर्षीय मेस्सीच्या नेतृत्वात अर्जेंटिनाने जुलैमध्ये कोपा अमेरिका स्पर्धेचे जेतेपद पटकावले.



देशाचे प्रतिनिधित्व करताना नामांकित आंतरराष्ट्रीय स्पर्धा जिंकण्याची ही त्याची पहिलीच वेळ ठरली. त्याला स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडूचा पुरस्कारही मिळाला होता.

यंदाचा फुटबॉल हंगाम सुरू होण्यापूर्वी मेस्सी बार्सिलोना संघ सोडून पॅरिस संघात दाखल झाला, मात्र त्याआधी त्याने बार्सिलोनासाठीही चांगली कामगिरी केली. २०२१ वर्षांत मेस्सीने एकूण ४१ गोल केले. त्याने मतदानाच्या सर्वाधिक ६१३ गुणांसह बॅलन डी'ओर पुरस्कार पटकावला.

**महिलांमध्ये अलेक्सिया पुतेयास ठरली सर्वोत्तम**

स्पेन आणि बार्सिलोनाची खेळाडू अलेक्सिया पुतेयास महिलांमध्ये बॅलन डी'ओर पुरस्काराची विजेती ठरली. तिने या वर्षी ४२ सामन्यांत २६ गोलची नोंद केली, तसेच महिलांच्या चॅम्पियन्स लीगच्या अंतिम सामन्यात चेल्सीविरुद्धही तिने गोल करत बार्सिलोनाच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली होती. तिने सर्वाधिक १८६ गुणांसह हा पुरस्कार मिळवला.

## जडेजाला धोनीहून अधिक मानधन

**चेन्नई : वृत्तसंस्था**

आगामी म्हणजेच २०२२च्या इंडियन प्रीमियर लीग पर्वासाठी रवींद्र जडेजा आता चेन्नई सुपर किंग्सचा सर्वांत महागडा खेळाडू ठरला आहे. चेन्नईच्या संघाने महेंद्र सिंग धोनीला १२ कोटींच्या किंमतीला रिटेन केले आहे, तर जडेजासाठी चेन्नईने १६ कोटी मोजलेत. म्हणजेच जडेजाला संघात घेण्यासाठी चेन्नईने धोनीच्या तुलनेत चार कोटी रुपये अधिक मोजले आहेत.

चेन्नईच्या संघाने आधी रवींद्र जडेजाची निवड रिटेन केला जाणारा फर्स्ट चॉइस खेळाडू म्हणून केली. त्यानंतर धोनीला संघात स्थान दिले. चेन्नईने एकूण चार खेळाडूंना रिटेन केले आहे.

## ...म्हणून राहुलने पंजाबपासून वेगळे होण्याचा निर्णय घेतला!

### प्रशिक्षक अनिल कुंबळेंचा खुलासा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२२च्या मेगा लिलावापूर्वी पंजाब किंग्सने त्यांचा कर्णधार के. एल. राहुलला संघमुक्त केले आहे. पंजाब किंग्सने मयंक अग्रवाल आणि अर्शदीप सिंगला कायम ठेवले आहे. दिग्गज लेग-स्पिनर आणि पंजाब किंग्जचे प्रशिक्षक अनिल कुंबळे यांनी मंगळवारी याबाबत खुलासा केला आहे.

फ्रँचायझी केएल राहुलला त्यांच्यासोबत ठेवू इच्छित होते, पण केएल राहुलने पुढे जाण्याचा निर्णय घेतला आहे. आम्ही त्यांच्या निर्णयाचा आदर करतो आणि तो त्याचा अधिकार



आहे, असे अनिल कुंबळे यांनी म्हटले. आयपीएलच्या १५व्या हंगामाच्या मेगा लिलावात राहुलचा समावेश होण्याची शक्यता कमी आहे. माध्यमांच्या वृत्तानुसार, राहुल आयपीएलमध्ये सहभागी होण्यासाठी लखनऊच्या नव्या टीमचे नेतृत्व करू शकतो. दोन नवीन आयपीएल फ्रँचायझींकडे लिलावापूर्वी तीन खेळाडूंची निवड करण्याचा पर्याय आहे.

पंजाब किंग्जमध्ये सहभागी झाल्यानंतर राहुलने जोरदार फटकेबाजी केली. गेल्या चार हंगामांत त्याने ६५९, ५९३, ६७० आणि ६२६ धावा केल्या. राहुलने आयपीएल २०२०मध्ये ऑरेंज कॅपही जिंकली होती, मात्र कर्णधार म्हणून तो फार चांगली कामगिरी करू शकला नाही. राहुल पंजाबला लीग स्टेजच्या पुढे नेऊ शकला नाही. पंजाबने २०१४पासून एकही प्ले-ऑफ सामना खेळलेला नाही.

# माझ्या संघाची कहाणी!

## कपिल देव यांनी शेअर केला '८३' चित्रपटाचा ट्रेलर





**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

बहुप्रतिक्षित '८३' चित्रपटाचा ट्रेलर लॉन्च झाल्यानंतर बॉलीवूड आणि भारतीय क्रिकेट चाहत्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. १९८३च्या विश्वचषकात भारताच्या विजयावर आधारित या चित्रपटात अभिनेता रणवीर सिंग कर्णधार कपिल देव यांची भूमिका साकारत आहे. इतिहास घडवण्यासाठी भारतीय संघाने वेगवेगळ्या अडचणींवर मात कशी केली यावर हा चित्रपट केंद्रित आहे. भारताचा माजी कर्णधार कपिल देव यांनीही त्यांच्या सोशल मीडिया अकाऊंटवर चित्रपटाचा ट्रेलर शेअर करताना 'माझ्या संघाची कहाणी' असे अभिमानाने म्हटले आहे.

कबीर खान दिग्दर्शित '८३'ची कथा भारताच्या ऐतिहासिक १९८३ क्रिकेट विश्वचषक विजयाभोवती फिरते. लंडनमधील लॉर्ड्सच्या मैदानावर भारतीय संघाने २५ जून १९८३ रोजी विश्वचषक जिंकत इतिहास रचला. काही दिवसांपूर्वी या चित्रपटाचा टीझर प्रदर्शित झाला होता. तो पाहिल्यावर चाहत्यांमध्ये चित्रपटाबाबतची उत्सुकता शिगेला पोहचली होती.

चित्रपटाच्या टीममध्ये रणवीर सिंग, एमी विर्क, चिराग पाटील, साकीब सलीम, ताहिर भसीन, जतिन सरना, जीवा, आदिनाथ कोठारे, साहिल खट्टर, पंकज त्रिपाठी हे कलाकार मुख्य भूमिकेत झळकणार आहेत, तसेच अभिनेत्री दीपिका पादूकोण कपिल देव यांच्या पत्नी रोमी यांच्या भूमिकेत दिसणार आहे. आता चाहते चित्रपटाच्या प्रदर्शनाची आतुरतेने वाट पाहात आहेत. '८३' हा चित्रपट २४ डिसेंबर रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com